दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे | अंक –१७१ | मंगळवार दि.२४ फेब्रुवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-171 | Tuesday, Dt.24 February 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# अजितदादा महाराष्ट्राला न मिळालेले सर्वोत्तम मुख्यमंत्री–देवेंद्र फडवणीसांचे विधान

मुबई : प्रतिनिधी

विधानसभेत अजित पवार यांच्या शोकप्रस्तावावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली. दादा आपल्यात नाहीत, ही खंत मनाला चटका लावणारी आहे, असे सांगताना त्यांनी अनेक आठवणींना उजाळा दिला. अजितदादा हे महाराष्ट्राला न मिळालेले सर्वोत्तम मुख्यमंत्री होते, असे स्पष्ट विधान त्यांनी केले.

अजित पवारांविषयी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत त्यांचे कौतुक केले. फडणवीस म्हणाले की, दादांची राजकीय कारकीर्द मोठी आणि प्रभावी होती. राजकारणात ते अजून मोठी इनिंग खेळतील, अशी अपेक्षा अनेकांना होती. मात्र जीवनाच्या प्रवासात त्यांनी पहिल्यांदाच टायमिंग चुकवले, असे भावनिक विधान त्यांनी केले. दादांचा वक्तशीरपणा सर्वपरिचित होता, त्यामुळे हे अचानक घडलेले वास्तव अधिक वेदनादायी असल्याचे त्यांनी सांगितले. याची सर्वाधिक हळहळ आपल्याला राहील, असेही ते म्हणाले.

दादांच्या काम करण्याच्या पद्धतीबाबत बोलताना फडणवीस यांनी अनेक आठवणी सांगितल्या. मंत्रालयात कुठल्याही अधिका–यांपेक्षा आधी पोहोचणारे ते नेते होते. सकाळी नऊ वाजता ते आपल्या दालनात बसलेले असायचे. वेळेचे काटेकोर पालन आणि कामातील शिस्त हे त्यांच्या स्वभावाचे मुख्य गुण होते. एखादा निर्णय त्यांना योग्य वाटला नाही तर ते फाईल थांबवून सविस्तर चर्चा करत. निर्णय घाईत न घेता विचारपूर्वक घेण्याची त्यांची सवय होती, असे त्यांनी स्पष्ट केले.

दादांच्या काही वैयक्तिक सवयींचाही फडणवीस यांनी उल्लेख केला. त्यांना दूध पिण्याची आवड होती. दादांच्या साध्या सवयी आणि स्वच्छतेकडे असलेले लक्ष त्यांना विशेष वाटायचे. ते चप्पल वापरत, पण पाय नेहमी स्वच्छ ठेवत, अशी आठवण त्यांनी सांगितली. अजितदादांचे नेतृत्व, कामातील सातत्य आणि प्रशासनातील पकड यामुळे ते वेगळे ठरले, असे फडणवीस यांनी अधोरेखित केले. मुख्यमंत्री होण्याची क्षमता असूनही ती संधी त्यांना मिळाली नाही, ही खंत त्यांनी पुन्हा व्यक्त केली. राज्याच्या राजकारणात त्यांनी निर्माण केलेला ठसा कायम राहील आणि त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्र त्यांना नेहमी लक्षात ठेवेल, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

### राजकारणात आणि प्रशासनात मोठी पोकळी

सभागृहातील वातावरण यावेळी गंभीर झाले होते. फडणवीस यांच्या शब्दांतून सहकार्याचा, जिव्हाळ्याचा आणि आदराचा सूर स्पष्टपणे जाणवत होता. अजितदादांनी घडवलेली कार्यपद्धती, अर्थसंकल्पीय परंपरा आणि निर्णयक्षम नेतृत्व ही राज्यासाठी मोठी संपत्ती होती, असे त्यांनी नमूद केले. त्यांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणात आणि प्रशासनात मोठी पोकळी निर्माण झाली असून ती भरून काढणे कठीण आहे.

### मागे–पुढे न पाहणारे नेते

कठोर निर्णय घ्यायचे असतील तर मागे–पुढे न पाहणारे नेते म्हणजे अजितदादा, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. एखादा निर्णय वादग्रस्त असला तरी तो ठामपणे मंत्रिमंडळासमोर मांडण्याची त्यांची तयारी असायची. वित्त विभागाने लाडकी बहिण योजनेचा भार अर्थसंकल्पावर मोठ्या प्रमाणात पडेल, त्यामुळे पुनर्विचार करावा, असा सल्ला दिला होता. मात्र त्या सूचनांनंतरही दादांनी ठाम भूमिका घेत तो विषय मंत्रिमंडळात आणला, याची आठवण त्यांनी करून दिली.



# अवकाळी पाऊस, गारपिटीने परळी मतदारसंघात पिकांचे मोठे नुकसान

## आ. धनंजय मुंडेंच्या जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना

परळी वैद्यनाथ ।प्रतिनिधी

परळी मतदारसंघातील अंबाजोगाई तालुक्यासह परळी तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये अवकाळी पाऊस, वादळासह गारपीट झाल्याने उभ्या शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनास अहवाल सादर करण्याच्या सूचना परळी मतदारसंघाचे आमदार माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना दूरध्वनी द्वारे केले आहेत.

रविवारी रात्रीपासून परळी मतदारसंघातील अंबाजोगाई व परळी तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व बऱ्याच गावांमध्ये गारपीट झाली असून, त्यामुळे गहू, ज्वारी, हरभरा,

(उर्वरीत पान २ वर)



# पाटोदा हद्दीत घरफोडी करणा–या आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने ठोकल्या बेड्या

बीड ।प्रतिनिधी

पाटोदा पोलीस स्टेशनच्या हद्दीत घरफोडी करणारे आरोपी कुठे आहेत याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळताच या पथकाने महासांगवी ता.जि.बीड गावचे शिवारात आरोपींना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांच्या ताब्यातुन गुन्हा करण्यासाठी वापरात आणलेली मोटर सायकल जप्त करून त्यांना रिपोर्टसह पोस्टे पाटोदा यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थागुशा बीड व पोस्टे पाटोदा हे करीत असुन आरोपीकडुन चोरीस गेलेल्या मुद्देमालपैकी दोन लाख रूपये रक्कम जप्त करण्यात आली आहे.



प्राप्त माहितीनुसार,पोलीस ठाणे पाटोदा गुरन. ४५/ २०२६ कलम ३३१(२),३०५ भारतीय न्याय संहिता प्रमाणे दाखल गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाणे पाटोदा येथील अधिकारी व अंमलदार करत असतांना दि.२०.०२.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारा मार्फत व तांत्रिक विश्लेषणाव्दारे माहिती प्राप्त झाली की, इसम नामे १) ज्योतीराम शरद भोसले वय २५ वर्षे रा.खांडवी ता. जामखेड जि. आहिल्यानगर व त्याचे दोन साथीदार नामे २) राहुल काशिनाथ पवार वय २० वर्षे रा.घोडेगाव ता. जामखेड जि. आहिल्यानगर ३) बनेश बाबुशा भोसले वय २० वर्षे रा.खांडवी ता. जामखेड जि. आहिल्यानगर यानी मिळुन सदरचा गुन्हा केला असुन ते आज पाटोदा येथुन जामखेड कडे जाणार आहेत.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा बीड येथील पोउपनि खटावकर,

(उर्वरीत पान २ वर)



# स्वच्छता हीच सेवा हा संत गाडगे महाराजांचा संदेश आजही प्रेरणादायी – डॉ.योगेश क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

राष्ट्रसंत गाडगे महाराजांनी कीर्तनांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. 'स्वच्छता हीच सेवा' हा त्यांचा संदेश आजही प्रेरणादायी आहे.त्यांचे विचार आजही समाजाला दिशादर्शक ठरत आहेत, असे प्रतिपादन भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

बीड शहरात स्वच्छता, समाजसेवा आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश

(उर्वरीत पान २ वर)

## महावितरण व हायटेक कंपनीच्या हलगर्जीपणामुळे आवेज परवेज शेख मृत्यू प्रकरणात गुन्हे दाखल करा मागणीसाठी

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रोश आंदोलन – डॉ. गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील रस्त्यांच्या मध्यभागी उभे असलेले महावितरणचे विद्युत खांब व उघड्यावरील रोहित्रांमुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला असून त्यांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे, तसेच महावितरण व हायटेक कंपनीच्या हलगर्जीपणामुळे गोरे वस्ती येथील १५ वर्षीय आवेज परवेज शेख याचा विजेचा धक्का लागून झालेल्या मृत्यू प्रकरणी



दोषींवर गुन्हे दाखल करावेत, या प्रमुख मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रोश आंदोलन करण्यात आले.

या वेळी आंदोलनकर्त्यांवरील गुन्हे मागे घ्या!, लोकशाही वाचवा! अशा जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक,

(उर्वरीत पान २ वर)

# गेवराई शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा चौकात उभारला जल्लोषात अश्वारूढ पुतळा



गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या छत्रपती चौकात रात्री उशिरा शिवभक्तांच्या पुढाकारातून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे. या ऐतिहासिक आणि भावनिक क्षणामुळे शहरात उत्साहाचे व जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, शहरातील छत्रपती शिवाजी चौकात उभारण्यात आलेल्या भव्य अश्वारूढ पुतळ्याला भाजप नेते बाळराजे पवार, युवा नेते यशराज पंडित, समाजभूषण राहुल खंडागळे, नगरसेवक मुन्ना मोटे यांनी ढोल ताशांच्या गजरात, क्रेनच्या साह्याने पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित शिवप्रेमींनी जोरदार घोषणा देऊन परीसर दणाणून सोडला.

गेल्या अनेक दिवसांपासून शिवप्रेमींकडून अश्वारूढ पुतळा उभारण्याची मागणी होत होती. अखेर मध्य रात्रीच्या सुमारास क्रेनच्या सहाय्याने हा भव्य पुतळा शिवाजी चौकात स्थापित करण्यात आला. पुतळा उभारण्यात आल्यानंतर उपस्थित शिवभक्तांनी फटाक्यांची आतषबाजी करून, छत्रपती शिवाजी महाराज की जय,या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

पुतळ्याची रचना आकर्षक असून, महाराज हातात तलवार घेऊन घोड्यावर विराजमान असलेला अश्वारूढ पुतळा आहे.

अनेक नागरिकांनी रात्री उशिरापर्यंत चौकात उपस्थित राहून महाराजांना अभिवादन केले. शहरातील विविध सामाजिक संघटना, व्यापारी व युवक

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)



संपादकीय....

# सत्तेच्या शिखरावरचा संयमी आवाज

स्त्रीने सत्तेच्या शिखरावर पोहोचावे, यासाठी ती 'वेगळी' असावी लागते असा अलिखित नियम आपल्या समाजात वर्षानुवर्षे रूढ आहे. ती जास्त आक्रमक असेल, तर 'खूप कडक' म्हणतात; शांत असेल, तर 'कमकुवत' ठरवतात. अशा साच्यात न बसता, स्वतःचा मार्ग घडवणाऱ्या स्त्रियांची संख्या कमी आहे. भारताच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन या त्याच विरळ गटातल्या.

१ फेब्रुवारी २०२६ रोजी सलग आठव्यांदा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करताना त्या केवळ अर्थमंत्री म्हणून उभ्या नव्हत्या, तर भारतीय स्त्रीच्या क्षमतेवर ठेवलेल्या विश्वासाचे प्रतीक म्हणून देशासमोर होत्या.

१८ ऑगस्ट १९५९ रोजी मदुराई येथे जन्मलेल्या निर्मला सीतारामन यांचे बालपण कोणत्याही राजकीय घराण्यात गेले नाही. वडील नारायणन सीतारामन हे भारतीय रेल्वेमध्ये नोकरीला होते. परिणामी, निर्मला यांचे बालपण एका शहरात न अडकता तिरुचिरापल्ली, तिरुपती, रांची अशा विविध शहरांत गेले.

या सततच्या स्थलांतरामुळे त्यांनी दक्षिणेतील मंदिरे, उत्तर भारतातील रेल्वे वसाहती, मध्यमवर्गीय कुटुंबांचे संघर्ष अशी भारताची विविधता पाहिली, अनुभवली. पुढे अर्थमंत्री म्हणून निर्णय घेताना त्यांच्या भाषणांत आणि धोरणांत 'संपूर्ण भारत' का दिसतो, याचे मूळ इथे सापडते. आई सावित्री सीतारामन या गृहिणी होत्या, पण त्या शिस्तप्रिय आणि शिक्षणावर भर देणाऱ्या होत्या. निर्मला लहानपणापासूनच वाचनप्रिय, मुद्देसूद बोलणाऱ्या आणि प्रश्न विचारणाऱ्या स्वभावाच्या होत्या.

निर्मला यांनी तिरुपती येथील सेव्हन हिल्स स्कूलमधून शालेय शिक्षण पूर्ण केले. पुढे त्यांनी येथून अर्थशास्त्रात पदवी घेतली. नंतर जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली येथून आंतरराष्ट्रीय अध्ययन व अर्थशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, जेएनयू नावाने प्रसिद्ध आहे. जेएनयूमध्ये शिकत असताना त्यावेळी विद्यापीठात डाव्या विचारसरणीचे वर्चस्व होते. मात्र निर्मला यांनी स्वतंत्र वैचारिक भूमिका घेतली. त्यांचा कल हळूहळू राष्ट्रीयतावाद आणि बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेकडे झुकत गेला. ही बाब अनेकांना फारशी माहीत नाही. जवाहरलाल नेहरू विद्यापीठात शिकताना निर्मला सीतारामन मोठ्या आवाजात घोषणा देणाऱ्या विद्यार्थिनी नव्हत्या. त्या ऐकून घेणाऱ्या, वाचन करणाऱ्या आणि विचार करणाऱ्या होत्या. अनेक महिलांना वाटते, की आपला आवाज ऐकू यावा, यासाठी मोठ्याने बोलावे लागते. १९८६ मध्ये निर्मला यांचा विवाह परकला प्रभाकर यांच्याशी झाला.

# उपसंचालक रेखा गायकवाड यांच्या शिरपेचात मानाचा तुरा

## राज्यमंत्री ना. मेघनाताई बोर्डीकर, प्रकाश अबिटकर यांच्या हस्ते मंत्रालयात आरोग्यरत्न पुरस्काराने सन्मानित

बीड ।प्रतिनिधी

स्वास्थ नारी, सशक्त परिवार अभियानांतर्गत राज्यातील उत्कृष्ट कार्य केलेल्या परिमंडळस्तरीय व जिल्हास्तरीय नोडल अधिकाऱ्यांना वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व महा आरोग्य सन्मान सोहळा कार्यक्रमात मुंबई येथील मंत्रालयात राज्यमंत्री ना. मेघनाताई बोर्डीकर, राज्यमंत्री प्रकाश आंबिटकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, पदाधिकारी, मान्यवरांच्या उपस्थितीत उपसंचालक डॉ. रेखाताई गायकवाड यांना आरोग्यरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राज्यामध्ये उत्कृष्ट सेवा पुरवणाऱ्या संस्था, अधिकारी व कर्मचारी यांचा दरवर्षी शासनामार्फत वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान कार्यक्रमात गौरव करण्यात येतो. दिनांक १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ दरम्यान स्वास्थ नारी, सशक्त परिवार हे



अभियान राबविण्यात आले. हे महिला आरोग्य अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रत्येक जिल्हा व परिमंडळस्तरावर एक महिला नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली होती. या अभियानांतर्गत उत्कृष्ट कार्य केलेल्या राज्यातील एक परिमंडळस्तरीय नोडल अधिकाऱ्याची आणि तीन जिल्हास्तरीय नोडल अधिकाऱ्याचा या मंत्रीमहोदयांच्या हस्ते गौरव सन्मान करण्यात आला. यामध्ये लातूर परिमंडळाच्या आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांचाही मंत्री महोदयांच्या हस्ते सन्मान करण्यात आला आहे. डॉक्टर रेखा गायकवाड यांना उत्कृष्ट कार्याबद्दल मिळालेल्या पुरस्काराचे सर्वस्तरातील स्नेहीजणांकडून अभिनंदन होत आहे.

डॉक्टर रेखा गोवर्धन गायकवाड उपसंचालक आरोग्य सेवा लातूर परिमंडळ यांची नारी स्वास्थ परिवार अभियानांतर्गत उत्कृष्ट कार्याबद्दल वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व आरोग्य सन्मान कार्यक्रमासाठी परिमंडळातील नोडल अधिकारी म्हणून निवड झाली. लातुर परिमंडळातील ग्रामीण भागातील महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी व कुटुंब सशक्तीकरणासाठी केलेले योगदान प्रेरणादायी आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली लातूर परिमंडळाने उल्लेखनीय कामगिरी बजावल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# अंधश्रद्धा आणि अस्वच्छतेविरुद्ध गाडगेबाबांनी आयुष्यभर लढा दिला– सभापती आरती बन्सोडे

बीड ।प्रतिनिधी

स्वच्छता आणि समाजसेवेचा संदेश देणारे थोर संत गाडगेबाबांनी हातात झाडू घेऊन कीर्तनाच्या माध्यमातून शिक्षणाचे महत्त्व सांगून अंधश्रद्धा आणि अस्वच्छतेविरुद्ध त्यांनी आयुष्यभर लढा दिला. त्यांच्या आदर्शावर चालण्याचा प्रयत्न आपण करु या असे प्रतिपादन नगर परिषद सभापती आरती बन्सोडे यांनी केले.

सोमवार दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन बीड नगर पालिकेच्या सभापती



आरती बन्सोडे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सभापती आरती बन्सोडे यांनी जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील महिला, पुरुष, दिव्यांग, वयोवृद्ध सर्वांची चौकशी केली. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यापुढे आपल्या नगर परिषदेच्या माध्यमातून सर्व अनाथ, बेघरांचा अडचणी दूर करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करील असे आश्वासन दिले. यावेळी जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजित वैद्य, मुख्य व्यवस्थापक राजु वंजारे, काळजीवाहक छाया सरोदे आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

# पंढरपूर येथे राधाकृष्ण आश्रमाच्या भव्य सभा मंडपाचे भूमिपूजन संपन्न



बीड ।प्रतिनिधी

हिंदू धर्माचे पवित्र तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे राधाकृष्ण आश्रमाचे संस्थापक सहदेव महाराज शास्त्री यांच्या संकल्पनेतून साकार होणाऱ्या भव्य सभा मंडपाच्या उद्घाटन व भूमिपूजन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी अखिल भारतीय देवसेना गुजर समाजाचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर, जिल्हा उपाध्यक्ष सुनील गुजर, जिल्हा सचिव गजानन बहिरवाळ, नारायण बहिरवाळ, तसेच सरपंच राम बहिरवाळ आणि माजी उपसरपंच अर्जुन येवले यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

# इखरा वाजेद शेखचा पहिला रोजा पूर्ण

प्रतिनिधी । धारूर

इखरा वाजेद शेख हिने अवघ्या ६व्या वर्षी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण करत कुटुंबीयांसह परिसरात कौतुकाची थाप मिळवली आहे. लहान वय असूनही तिने दिवसभर संयम, श्रद्धा आणि उत्साह राखत रोजा पूर्ण केला. सकाळपासूनच तिने नमाज, कुरआन पठण आणि इबादतीत वेळ घालवला. दिवसभर उपवास करतानाही तिच्या चेहऱ्यावर आनंद आणि आत्मविश्वास दिसत होता.



संध्याकाळी इफ्तारच्या वेळी कुटुंबीयांनी तिचे अभिनंदन केले व तिच्यासाठी विशेष तयारी केली होती. इखराच्या या प्रयत्नामुळे घरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून नातेवाईक व मित्रपरिवाराकडूनही तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. लहान वयातच धार्मिक संस्कार जपत तिने दाखवलेला हा आदर्श इतर मुलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# सूर्यमुद्रा फाऊंडेशन नांदेड च्या वतीने महामानवांचा आगळावेगळा संयुक्त जयंती सोहळा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी । नांदेड

सूर्यमुद्रा फाऊंडेशन नांदेड च्या वतीने प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांचे ऊर्जाकेंद्र माता भीमाई आणि हिमालयाची सावली त्यागमूर्ती माता रमाई आणि राष्ट्रसंत रविदास महाराज ह्यांचा संयुक्त जयंती सोहळा अमृत विद्यार्थी संस्कार केंद्र, श्रावस्तीनगर नांदेड येथे उत्साहात संपन्न झाला.या सोहळ्या निमित्त भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डेप्युटी इंजि.भारत कुमार कानिंदे हे होते.प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महापुरुष आणि महामाता यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.यावेळी सर्व मान्यवरांना ग्रंथ आणि पुष्पगुच्छ हर्षवर्धन सोनकांबळे,अनिल सोनकांबळे,शंकर गायकवाड आदी पदाधिकाऱ्यांनी देवून त्यांचे स्वागत केले.त्यानंतर या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आणि सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.विलासराज भद्रे यांनी प्रास्ताविक करून सोहळ्याच्या प्रथम सत्रात महासुर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आई माता भीमाई ह्यांच्या जीवन कार्यावर भारतीय बौद्ध महासभा नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष आयु.गणपत गायकवाड यांनी प्रभावी शब्दांत प्रकाश टाकला.त्यानंतर सुप्रसिद्ध लेखिका विचारवंत डॉ. निर्मला भामोदे (अकोला) ह्यांनी आपल्या ओघवत्या शैलीत राष्ट्रसंत रविदास महाराज यांच्या पुरोगामी विचारांचे बंडखोर साहित्य आणि जीवन संघर्षाचे चित्रण केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हिमालया समान कार्याला आपली खंबीर साथ देणाऱ्या माता रमाई यांच्या त्याग,प्रखर झुंज आणि समर्पण यांचे भावस्पर्शी चित्रण प्रज्ञासूर्य समता परिषद प्रवक्त्या आणि युवा वक्ता आरती कांबळे यांनी केले.या तिन्हीं व्याख्याना मुळे रसिक मंत्रमुग्ध झाले.द्वितीय सत्रात अखिल भारतीय संत रविदास साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ख्यातनाम साहित्यिक, विचारवंत डॉ.निर्मलाताई भामोदे (अकोला) यांचा आणि रायगडा कडून राजगृहाकडे ह्या नाटकाला महाराष्ट्र शासनाचा राम गणेश गडकरी उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार मिळाल्याबद्दल सुप्रसिद्ध लेखक,वक्ते आयु.गणपत गायकवाड यांचा विशेष सत्कार इंजी.भारतकुमार कानिंदे, डॉ.विलासराज भद्रे,आरती कांबळे यांच्या हस्ते करण्यात आला.संयुक्त जयंती सोहळ्याच्या तृतीय सत्रात अनेक पुरस्कार प्राप्त ख्यातनाम अभिनेते आणि विचारवंत प्रा. पुंडलिकराव भामोदे (अकोला) यांनी मी ज्योतिराव फुले बोलतोय ह्या एकपात्री नाटकातून आपल्या उत्कृष्ट लेखन आणि जिवंत अभिनयाने रसिकांची मने जिंकली.गोरगरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण,उत्तम संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास देणाऱ्या मराठवाड्यातील पहिल्या विद्यार्थी संस्कार केंद्राच्या गेल्या ३ वर्षातील दैदिप्यमान



वाटचालीबद्दल सर्व मान्यवरांनी मुख्य संचालक डॉ. विलासराज भद्रे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे मनस्वी कौतुक केले. आणि असंख्य संकटाशी संघर्ष करत नवीन पिढी घडविणाऱ्या ह्या स्वाभिमानी केंद्राला समाजाने उत्स्फूर्त मदत करावी असे प्रतिपादन केले.रसिकांच्या अप्रतिम प्रतिसादाने यशस्वी झालेल्या ह्या संयुक्त जयंती सोहळ्यास मोठ्या संख्येने महिला आणि विद्यार्थी उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या शेवटी मिठाई वाटप करून सोहळ्याचा गोड समारोप करून हा कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने यशस्वीरित्या संपन्न करण्यात आला

## पान १ वरून...

**अवकाळी पाऊस, ....**

भाजीपाला, फळपिके यांसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून आर्थिक मदत मिळावी, यासाठी धनंजय मुंडे यांनी तत्काळ पंचनामे करून नुकसानीचे अहवाल शासनास पाठवण्याचा सूचना जिल्हा प्रशासनाला केल्या आहेत.

या पूर्वी देखील खरीप हंगामात विशेष करून हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात परळी मतदारसंघात अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे प्रचंड मोठे नुकसान झाले होते. धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून पंचनामे व अन्य व्यवस्थापनाच्या माध्यमातून मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला होता. त्याच पार्श्वभूमीवर गारपीट व वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची देखील भरपाई शेतकऱ्यांना मिळावी, यासाठी धनंजय मुंडे यांनी पुढाकार घेतला आहे.

**स्वच्छता हीच सेवा....**

देणाऱ्या राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (दि.२३) राष्ट्रसंत गाडगे महाराज पुतळा परिसरात त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. योगेश क्षीरसागर अतिथी म्हणून बोलत होते.याप्रसंगी नगरसेवक शुभम धुत, मंगेश धोंगडे, राजाभाऊ पिंगळे, अशोक तांबारे, अमोल पौळ, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, विठ्ठल गुजर, शुभम कातांगळे, प्रा. रवी शिंदे, विकास यादव, शारदाताई डुलगज तसेच प्रशांत पवार, मोहन राऊत, विक्रम वाघमारे, रमेश घोडके, सुशांत राऊत यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पाटोदा हद्दीत....**

पोह/सोमनाथ गायकवाड, पोह/ राहुल शिंदे, पोह/बाळु सानप, पोअ/अर्जुन यादव, पोअ/मनोज पराणे, पोअ/अशफाक सय्यद चापोह वडमारे व मांजरे असेंनी मिळालेल्या बातमीच्या आधारे पाटोदा येथे जावुन आरोपीची माहिति घेतली असता सदरचे आरोपी मोटर सायकल वरून साकत मार्फे जामखेड येथे गेल्याचे समजले. पथकाने त्यांच्या मोटर सायकलचा पाठलाग करून नमुद आरोपीस शिताफीने अटक केली आहे. तसेच त्यांच्याकडुन आणखीन गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी मा. पोलोस अधीक्षक नवनीत कॉवत,अप्पर पोलीस अधीक्षक बीड सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक स्थागुशा बीड शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि खटावकर, पोह/ सोमनाथ गायकवाड, पोह/बाळु सानप, पोह/ राहुल शिंदे, पोअ/अर्जुन यादव, पोअ/मनोज परझणे, पोअ/अशफाक सय्यद, चापोह वडमारे व मांजरे असेंनी मिळून केली आहे.

**महावितरण व हायटेक....**

बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व पालकमंत्री यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात शेख युनुस,मुबीन शेख, माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी), रामधन जमाले ( जिल्हाध्यक्ष इटक), शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, राजेंद्र आमटे, शेतकरीपुत्र हक्क आंदोलक,किष्किंधा पांचाळ ( अध्यक्ष विश्वकल्याण महिला सेवा भावी संस्था बीड) शेख तालेब (पत्रकार सिटीझन), नितिन जायभाये ( अध्यक्ष बीड शहर बचाव विचारमंच) , प्रा . राजकुमार कदम,प्राचार्य डी.जी.तांदळे ( जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य किसान सभा बीड) डॉ.संजय तांदळे ( अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते संघटना बीड), बाजीराव ढाकणे, शेख बशीर ( राज्याध्यक्ष म.र. जि.प.सेवा निवृत्त कर्मचारी संघटना), शेख वाजेद,शेख इमरान,शेख रिजवान,शेख सरफराज, शेख आमेर,शेख रीयाज, सय्यद नवाब,शेख तौफीक, विठ्ठल सवासे आदी सहभागी होते.

**गेवराई शहरात छत्रपती....**

मंडळांच्या वतीने या घटनेचे स्वागत करण्यात आले आहे. काही ठिकाणी मिठाई वाटप करून आनंद साजरा करण्यात आला. सकाळपासूनही नागरिक मोठ्या संख्येने चौकात येऊन पुतळ्याचे दर्शन घेत आहेत.

दरम्यान, या पुतळ्याच्या स्थापनेनंतर पुढील नियोजन, सुशोभीकरण व अधिकृत उद्घाटनाबाबत प्रशासनाची भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तरीही, गेवराईकरांसाठी अभिमानाचा क्षण ठरत असून शहराच्या वैभवात आणखी भर पडल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. दरम्यान, गेवराई प्रशासनाच्या वतीने कोणतीही भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही. या संदर्भात लवकरच सकारात्मक निर्णय होण्याची शक्यता असून, सर्व समावेशक बैठकीतून काय मार्ग निघतो, याकडे लक्ष लागले आहे. पुतळा उभारण्यात आल्यानंतर, येथील आसरा फाउंडेशनचे संस्थापक अभिजित काला यांनी २५ किलो पेढे वाटून आनंद व्यक्त केला असून, राम आप्पा हादगुले यांनी ६० लिटर मसाला दूध मोफत वाटपाचा कार्यक्रम घेतला.

# कृषीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## एआय फॉर ग्री २०२६ परिषदेचे शानदार उद्घाटन संपन्न

## कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचे लोकार्पण




मुंबई ।प्रतिनिधी

शेतकऱ्याने डिजिटल सेवांचा आत्मविश्वासाने वापर केला पाहिजे. शेतकऱ्यांसाठी सुरू केलेल्या विविध डिजिटल पमुळे शेतकरी त्यांच्या भाषेत संवाद साधून शेती विषयक प्रश्नांचे उत्तर त्वरित मिळवू शकतात. महा-एआय इनोव्हेशन सेंटरद्वारे विद्यापीठे, संशोधन संस्था, उद्योग यांना एकत्र आणून एका डिजिटल सक्षम परिसंस्थेद्वारे शेतकऱ्यांचे जीवनमान सुकर करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांच्या व्यापक हितासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीचा सर्वसमावेशक विकास करण्यावर शासनाचा भर असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले.

महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९' धोरणांतर्गत येथील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे 'जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन'(एआय फॉर ग्री २०२६) च्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जितेंद्र सिंह, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, कृषी राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, अपर मुख्य सचिव (कृषी) विकास चंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प संचालक परिमल सिंह, जागतिक बँकेचे कार्यकारी संचालक परमेश्वरन अय्यर आदी उपस्थित होते.



# हवामानात बदल गडगडाटासह हलक्या पावसाच्या सरी

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

अंबाजोगाई शहर व परिसरात बदलत्या हवामानाचा अंदाज आल्याने शेतीच्या कामांना ब्रेक लागलेला असून गडगडाटासह हलक्या पावसाच्या सरी पडल्या. हवेत गारवा निर्माण झाला आणि अचानकच वादळी वाऱ्यासह हलक्या पावसाच्या सरी पडल्या काही ठिकाणी छोट्या व्यावसायिकांची तारांबळ उडाली. अंबाजोगाई शहर व परिसरात दुपारी अचानकच पावसाच्या सरी कोसळल्या.पुढे जर अवकाळी पाऊस झालाच तर गहु,हरभरा,कांदा पिकांचे तर आंब्याचे फार मोठे नुकसान होईल अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे सोमवारी दुपारपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले लगेच आलेल्या हलक्या सरींचे अनेक व्हिडीओ नेटकऱ्यांनी सोशल मिडीयावरून व्हायरल केले आहेत.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १३० / २०२६**
**रूखमिन – विरूध्द – निरंक**
**(मार्फत अॅड एच.एस. पाटील )**

मृताचे नाव रामू सुखदेव जाधव आहे. गेवराई जि. बीड येथे त्यांचे निधन झाले आहे.

अर्जदार
१) रूखमिन भ्र. रामु जाधव वय ५६ वर्षे धंदा- शेती व घरकाम रा. कुंभारवाडी ता. गेवराई जि.बीड
२ शारदा ब्र. विष्णू पोटे
वय ४० वर्षे धदा शेती रा. मन्यारवाडी ता. गेवराई जि. बीड
३ अंकुश पी. रामू जाधव
वय ३६ वर्षे धंदा- शेती रा. कुंभारवाडी ता. गेवराई जि.बीड
४ बदाम पाकळ्या रामू जाधव
वय ३३ वर्षे धंदा- शेती रा. कुंभारवाडी ता. गेवराई जि.बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता

मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या क घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे रामु सुखदेव जाधव रा कुंभारवाडी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : ०२.०४.२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर**
**बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ३१२/२०२६**
**अल्का जाधव व इतर वि. निरंक**
**विधीज्ञ- योगेश एस. टेकाडे**
**मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार
१) अल्का भ्र. सुंदर जाधव, वय ५६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. मित्र नगर बीड, ता. जि.बीड
२) श्याम पि. सुंदर जाधव, वय ३३ वर्षे, धंदा-व्यापार, रा. मिंत्र नगर बीड, ता. जि.बीड
३) निकिता पि. सुंदर जाधव, वय २३ वर्षे, धंदा-व्यापार, रा. मित्र नगर बीड. ता. जि.बीड
४) नेहा भ्र. चंदन पाटील, वय ३१ वर्षे, धंदा-घरकाम, रा. रमन मळा, कोल्हापूर
५) प्रमिला भ्र. मदनराव जाधव, वय-७५वर्षे, धंदा-घरकाम, रा. मित्र नगर बीड, ता.जि.बीड

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे सुंदर मदनराव जाधव हे दिनांक २२/०६/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क. ३ व ४ हया मयताच्या मुली असून अर्जदार क.५ ही मयताची आई आहे. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे सुंदर मदनराव जाधव यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरह मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरह मयत सुंदर मदनराव जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०२/०४/२०२६ आहे.

आज दिनांक २३/०२/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

स्वाक्षरित/-
क.लिपीक
दिवाणी न्यायालय
व.स्तर,बीड

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
अधीक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,बीड

---

# गारपीट, अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करा- पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

लातूर ।प्रतिनिधी

जिल्ह्यात काही ठिकाणी गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतपिकांचे नुकसान झाले आहे. तसेच काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे. या नुकसानीचे पंचमाने तातडीने करण्याच्या सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज दिल्या. त्यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्याकडून दूरध्वनीद्वारे जिल्ह्यातील नुकसानीची माहिती घेतली.

रेणापूर, अहमदपूरसह इतरही तालुक्यांमध्ये अवकाळी पाऊस, गारपीट, वादळी वाऱ्यामुळे शेतपिकांच्या नुकसानीच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे संबंधित तालुक्यातील सर्व नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. यासोबतच घरांची पडझड झालेल्या ठिकाणी नागरिकांना आवश्यक मदत तातडीने उपलब्ध करून द्यावी. आगामी काही दिवस अवकाळी पावसाचा इशारा असल्यामुळे सर्व प्रशासकीय यंत्रणांनी सतर्क राहावे. वादळी वारे, विजांचा कडकडाट होत असताना नागरिकांना आवश्यक खबरदारी घेण्याच्या सूचना द्याव्यात, असे पालकमंत्री भोसले यांनी सांगितले.

---

## जाहीर प्रगटन

**मा. विशाखा बी. पाटील ६वे सह. दिवाणी न्यायाधीश.व.स्तर. बीड यांचे न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ३७०/२०२५**
**तारामती राजाराम निर्मळ विरूध्द सुमनबाई राजाराम निर्मळ**

अर्जदार
१ तारामती भ्र. राजाराम निर्मळ, वयः ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड.
२ बंडू पि. राजाराम निर्मळ, वयः ४५ वर्षे, धंदा शेती, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड.
३ सतिष पि. राजाराम निर्मळ, वयः ४२ वर्षे, धंदा शेती, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड.
४ दिनेश पि. राजाराम निर्मळ, वयः ४० वर्षे, धंदा शेती, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड

**विरुध्द**
**गैर-अर्जदार**

१.सुमनबाई भ्र. राजाराम निर्मळ, वयः ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. वसाहती कॅम्प समोर, गोवर्धन रोड सिरसाळा, ता. परळी जि. बीड.
२.रेखा पि. राजाराम निर्मळ, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. वसाहती कॅम्प समोर, गोवर्धन रोड सिरसाळा, ता. परळी जि. बीड.

मागणी : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत राजाराम सखाराम निर्मळ, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी राजाराम सखाराम निर्मळ, मृत्यु दि. २९/०८/२०२१, रोजी रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड. येथे मयत झालेले असून अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ते ४ यांची आई असून मयत राजाराम सखाराम निर्मळ, अर्जदार क. १ चा पती असून २ ते ४ चे वडील होते. गैरअर्जदार क. १ ही मयताची दुसरी पत्नी असुन गैहअर्जदार क. २ हि तिची मुलगी आहे.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दूल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत राजाराम सखाराम निर्मळ, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड. यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१ माहे ०३ सन २०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि.२५/०४/२०२५ आहे.

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
अधीक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,बीड

---



# तुलसी महाविद्यालयात संत गाडगे महाराज यांना अभिवादन

बीड ।प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित, तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे थोर समाजसुधारक, संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोमवार, दि. २३ रोजी अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले, तसेच स्वच्छता, समाजप्रबोधन आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांसाठी त्यांनी दिलेले योगदान विद्यार्थ्यांसमोर अधोरेखित करण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डी.राऊत, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश ढोकणे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.अंकुश सुर्वे, डॉ.योगिता लांडगे, प्रा.विवेक जोगदंड, एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा.सुरेश कसबे, प्राद्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**Maharashtra State Waqf Board, Chhatrapati Sambhajinagar-431 002**
**No. Maravam/Atiyat/No.No. 86 /847/2026 Dated 9 FEB**
**FORM 40**
**[See rule 32(1)]**
**PUBLIC NOTICE**

Whereas a vacancy in the office of Mutawalli of Dargah Haji Peer Saheb Shah Ashoorkhana and one Grave, Village. Wakulni, Tq. Badnapur, Dist. Jalna as arise and as per the terms of Deed, there is no other person to be appointed again for this vacancy, hence, it is hereby notified for the information of the public or persons interested in this Waqf that Mr. Sayyad Rashid Sayyad Mahemood, At. Near Nurani Chowk Jahangir Colony, Harsool, Tq. and Dist. Chhatrapati Sambhajinagar has been proposed by the District Waqf Officer, Jalna District for filling up of vacancy of the Mutawalli of the said institution as per details in the schedule below for being appointed as Temporary Mutawalli, for such period and under such terms and conditions as the Maharashtra State Board of Waqf may think fit.

Schedule

| Sr.Well | Item | Details |
|---|---|---|
| 1 | Name of the Waqf Institution | Dargah Haji Peer Saheb Shah Ashoorkhana and one Grave, Village. Wakulni, Tq. Badnapur, Dist. Jalna |
| 2 | Registration No. and Date | MSBW/JLN/56/2010 |
| 3 | Detail of Appointment of Mutawalli under the Waqf Deed | Syed Yasin Bane Miyan as Per Govt. Newspaper Sr. no. 56, Part "C" Dt. 21.06.1973, Jalna Taluka |
| 4 | Name of person proposed as Mutawalli under section 63 of the Waqf Act, 1995 | Mr. Syed Rashid Syed Mahemood |
| 5 | Name of the former Mutawalli | Syed Yasin Bane Miyan |

Anyone having objections/suggestions to this proposal, may in writing inform the same to the Chief Executive Officer/authorized Officer within seven days, from the date of publication of this Notice failing which, it will be presumed that there are no objections/ suggestions and the Board will proceed further in appointing the person notified herein above as the Temporary Mutawalli of the above said institution under section 63 of the Waqf Act, 1995.

**(Juned Sayyad)**
**Chief Executive Officer**
**Maharashtra State Board of Waqf**
**Chhatrapati Sambhajinagar**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१५ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दुल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सिमा फेरोज शेख | मुलगी | २०.०५.१९९७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१३ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दुल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आमेर फेरोज शेख | मुलगा | १४.०४.१९९८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१८ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दुल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुमेरा फेरोज शेख | मुलगी | २०.११.२००० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०३८ दि.२८.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अमोल प्रकाश ठुले, रा.पांगरखेडा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अवनी अमोल ठुले | मुलगी | २४.०९.२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१६ दि.०५.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दुल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अशरफ फेरोज शेख | मुलगा | ०६.०१.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१४ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दुल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सानिया फेरोज शेख | मुलगी | ०७.१२.२००२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९९४ दि.३०.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **संजय साधु पोले, रा.चुर्मापुरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | माऊली संजय पोले | मुलगा | ०५.०८.२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१७ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अब्दुल्ला अशरफ शेख रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | फेरोज अब्दुल्ला शेख | मुलगा | १७.१२.१९७८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



# गुरु तेग बहादूर यांच्या शौर्यगाथेचे समूहगानातून अभिवादन

## 'हिंद दी चादर' शहीदी समागम वर्षानिमित्त कणकवलीत प्रेरणादायी उपक्रम

सिंधुदुर्गनगरी ।प्रतिनिधी

श्री गुरु तेग बहादूर यांनी तत्कालीन शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुद्ध आवाज उठवत धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठी आपले प्राण अर्पण केले. त्यांच्या या अद्वितीय बलिदानामुळे भारताच्या सांस्कृतिक व अध्यात्मिक अस्मितेचे रक्षण झाले. शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त शासन विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांचा गौरवशाली इतिहास जनतेपर्यंत पोहोचवत आहे. आजच्या समूहगानातून आपण गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त करत असून या उपक्रमातून नवप्रेरणा मिळत असल्याचे जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे म्हणाल्या.

'हिंद दी चादर' म्हणून ओळखले जाणारे गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त हा समूहगान उपक्रम कणकवली येथील विद्यामंदिर माध्यमिक प्रशाला येथे घेण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या.या प्रसंगी तहसिलदार दिक्षांत देशपांडे, जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत, शिक्षणाधिकारी कविता शिंपी, मुख्याधिकारी गौरी पाटील, तसेच मुख्याध्यापक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा प्रशासनाच्यावतीने आयोजित या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत सामूहिकरित्या प्रेरणादायी गीत सादर केले. सुप्रसिद्ध गायक सतिंदर सरताज यांनी गुरु तेग बहादूर यांच्या जीवनकार्यावर आधारित सादर केलेले गीत समूहगानातून गायले गेले. या गीताच्या माध्यमातून गुरुंच्या त्याग, शौर्य, धर्मस्वातंत्र्य व मानवतेच्या मूल्यांची जाणीव उपस्थितांना करून देण्यात आली.

# १६८ टीएमसी पाण्यात बीड जिल्ह्याचा हिस्सा किती?

प्रतिनिधी । बीड



मराठवाड्यातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी कोकणातील १६८ टीएमसी पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. या योजनेला नाव मराठवाड्यातील असले तरी सध्या बहुतांश प्रकल्प नाशिक भागातील होत आहेत. १६८ टीएमसी पाण्याचे नियोजन करणे सुरु आहे, या पाण्यातून बीड जिल्ह्यातील शेतीला किती पाणी मिळणार, असा रोकडा सवाल श्रृंगऋषीगड येथे आयोजित संवाद बैठकीत उपस्थित शेतकर्यांनी लोकप्रतिनिधींना केला.

या बैठकीस बप्पासाहेब तळेकर, राजसाहेब पवळ, भाऊसाहेब जरांगे पाटिल, शिवप्रसाद खेडकर, रामराव खेडकर, ह.भ.प.सुरेश महाराज कोळेकर,धुराजी बाबा कोळेकर, राज पाटील, अशोकराव निपटे,

तुकाराम तळतकर, परमेश्वर वाघमोडे, गावडे मामा, गणेश कोळेकर, महादेव कारांडे, सुधीर माने भारत सोळुंके, गोपाल आहेर, भाऊसाहेब महानोर, सरपंच नंदकुमार शिंदे, दीपक जाधव आदींसह शेतकरी उपस्थित होते.

सिंदफणा पट्ट्यासह बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतीला जायकवाडी धरण अथवा पाटाचे पाणी मिळत नाही. त्यातच बीड जिल्ह्यात दर तीन चार वर्षांने दुष्काळ पडतो. त्यामुळे फळबाग, ऊस, भाजीपाला उत्पादकसह इतर शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या शेतकऱ्यांना जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे यासाठी तीनशेपेक्षा अधिक गावांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाची महत्वाची वार्षिक बैठक शिरूर तालुक्यातील श्रृंगऋषीगड येथे आयोजित केली होती. या बैठकीत लोकलढा आंदोलनाच्या कामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी जलतज्ज्ञ व अनुभवी शेतकरी यांनी मार्गदर्शन केले.

मराठवाड्यातील शेतीला पाणी मिळावे व या भागातील दुष्काळ दूर व्हावा यासाठी सरकार पश्चिमी वाहिनी नद्यांचे कोकणात जाणारे यातील १६८ टीएमसी पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी विविध योजना राबवित आहे. ही योजना मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी असली तरी सध्या या योजनेतून नाशिक व इतर भागातच कामे सुरू आहेत, सरकारला जर बीड जिल्ह्यातील दुष्काळ दूर करायचा असेल तर बीड जिल्ह्यातील शेतीला नेमके किती पाणी मिळणार आहे हा आकडा सरकार व बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी सांगावा असा प्रश्न या बैठकीत शेतकऱ्यांनी उपस्थित केला. जायकवाडी धरणाचे पाणी नांदेड पर्यंत गेले, मात्र हे पाणी बीड जिल्ह्यातील ऐंशी टक्के शेतीला मिळत नाही, माजलगाव धरण व गेवराई तालुक्यातून जाणार्या कालव्याचे पाणीही सरकारने कमी केले, आता १६८ टीएमसी पाण्यापासूनही बीड जिल्हा वंचित राहिल्यास बीड जिल्ह्यातील शेतकर्यांच्या नशिबी ऊसतोड, तरुणांचे स्थलांतर व आत्महत्या कायम राहत्याल. त्यामुळे १६८ टीएमसी पाण्यात बीड जिल्ह्यातील शेतीला किती पाणी मिळणार, सर्व बीड जिल्हा पाण्याखाली येईल का, यासाठी सरकार व लोकप्रतिनिधी यांनी काय केले, याची माहिती जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी शेतकर्यांना द्यावी, अशी मागणीही यावेळी शेतकर्यांनी केली. या बैठकीस शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### शेतकरी करणार व्यापक आंदोलन

जायकवाडी धरण झाले तेव्हा बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतीला हे पाणी मिळाले नाही, जायकवाडी धरणाचे आपल्याला जे पाणी मिळते त्यात २०१८ मध्ये कपात करण्यात आली. आताही कोकणच्या पाण्यात बीड जिल्ह्यातील शेतीला हिस्सा न मिळाल्यास शेतकर्यांच्या पिढ्यानपिढ्या बरबाद होतील. त. त्यामुळे बीड जिल्ह्यातील वंचित शेतीला पाणी मिळावे, यासाठी येत्या काळात व्यापक जनआंदोलन करण्याचा निर्धारही या बैठकीत शेतकऱ्यांनी केला.

### लोकप्रतिनिधींनी भूमिका मांडावी

२०४७ सालापर्येंत विकसित भारत करण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून शासनाच्या वतीने शेती सिंचन वाढविणे, हेही एक धोरण आहे. याच धोरणाचा भाग म्हणून सिंचन योजना राबविण्यात येणार आहेत. या योजनांतून बीड जिल्ह्यातील शेतीला किती पाणी मिळणार, यासाठी काय योजना करण्यात येणार आहे व किती टीएमसी पाणी बीड जिल्ह्यातील शेतीला मिळेल यावर पालकमंत्री, खासदार व आमदार यांनी भूमिका मांडावी, अशी मागणीही या बैठकीत करण्यात आली आहे.

# रोहित पवारांच्या जीवितास धोका, त्यांना झेड प्लस सुरक्षा द्यावी

## जामखेड तालुक्यात पोलीस प्रशासनाला निवेदन

प्रतिनिधी । अहिल्यानगर

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारीला विमान अपघातात मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली होती. दरम्यान, अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत विविध शंका उपस्थित केल्या जात आहेत. विशेषत: या विमान अपघाताबाबत आमदार रोहित पवार यांनी काही खळबळजनक आरोप केले आहेत. याच पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवारांना झेड प्लस सुरक्षा द्यावी, अशी मागणी जामखेड तालुक्यातील राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केली आहे. खर्डा येथील पोलीस ठाण्यात पोलीस प्रशासनाला निवेदन देत ही मागणी केली आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूबाबत रोहित पवारांनी घातपाताची शक्यता व्यक्त केल्याने जीवितास धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, यावेळी बोलताना रोहित पवारांनी दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेत खळबळजनक दावा केला आहे. सोबतच यावेळी व्हीआरएस कंपनीवर काही गंभीर आरोप करत भाजपच्या ट्रॉलर्सलाही खडेबोल सुनावले आहे दरम्यान, अकाउंटेबल, फ्लाईट सेफ्टी मॅनेजरची चौकशी झाली का? त्यांना अटक झाली का? या जबाबदार व्यक्ती आहेत. हि व्यक्ती मोठं प्रस्त आहे, म्हणून त्यांना वाचनावण्यात येतंय. यातील एका कंपनी अधिकाऱ्यांवर अत्याचाराचे आरोप आहेत. लायसन्स नसताना अनधिकृतपणे विमान चावण्यात येत होते. तर भाजपचे ट्रोल या पत्रकार परिषदेला ट्रोल करत आहेत. आम्हाला प्रश्न पडतो की भाजपच्या ट्रोलकडून इतका विरोध का? त्या ट्रोलला पैसे कोण देतंय? ते भाजपची बाजू मांडत असतात हे आम्हाला माहिती आहे. यांनी पूर्वी रोहित शेट्टींना ब्लॅकमेल केलं होतं. भाजपचे ट्रोल जर विरोध करतात तर मग या कटात भाजपही सहभागी आहे का? अशी शंका निर्माण होते. असेही रोहित पवार म्हणाले

# कर्नाटकात नेतृत्व बदलाचे वारे, मुख्यमंत्री सिद्धरामैया विरोधात आमदार एकवटले

प्रतिनिधी । अहिल्यानगर

कर्नाटकमध्ये मुख्यमंत्री पदावरून सिद्धरामैया आणि उपमुख्यमंत्री डी.के शिवकुमार यांच्यातील सत्तासंघर्ष पुन्हा एकदा तीव्र झाला आहे. काँग्रेसमधील काही आमदारांनी नेतृत्व बदलाची उघडपणे मागणी केली आहे. डी.के. शिवकुमार २६ फेब्रूवारी रोजी दिल्लीमध्ये पक्षाच्या हायकमांकडची भेट घेणार असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, लिंगायत आणि वोक्कालिगा मतदारांना सांभाळण्याचे मोठे आव्हान काँग्रेससमोर उभे आहे.

रविवारी (दि.२२) काँग्रेस आमदार एच.ए.इक्बाल हुसेन यांनी नेतृत्व बदलाच्या मागणीला दुजोरा देत म्हटले की, आम्हाल बदल हावा आहे. इतरांनाही संधी द्यावी, अशी आमची भूमिका आहे. आगामी निवडणुका लक्षात घेऊनच आम्ही हा बदल सुचवत आहोत. हायकमांडने नेतृत्व बदलाबाबत असेलेला संभ्रम लवकर दूर करावा, अशी मागणी त्यांनी केली माझ्यासह अनेक आमदार आणि मंत्र्यांची हीच भूमिका आहे. कोणताही संभ्रम न ठेवता याबाबत स्पष्ट निर्णय घ्यावा, असे ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांना २६ फेब्रूवारी रोजी पुन्हा दिल्लीला बोलवण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. दरम्यान, सिद्धारमैया गटाने मुख्यमंत्री बदलाची मागणी सातत्याने फेटाळून लावली आहे, तर शिवकुमार गटाने नेतृत्व बलावर ठाम भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमिवर सार्वजनिक बांधकाम मंत्री सतीश जारकीहोळी यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची भेट घेतली आहे. शिवकुमार यांनी फेब्रूवारी अखेरपर्यंत काँग्रेस विधिमंडळ पक्षाची बैठक बोलवण्याचा आग्रह धरल्याची माहिती आहे.

दरम्यान, काँग्रेस हायकमांडसमोर राजकीय समतोल राखण्याचे मोठे अव्हान आहे. शिवकुमार यांना पाठिंबा दिल्यास सिद्धरामैया यांच्याशी जोडलेल्या लिंगायत आणि अल्पसंख्यांक मतदारांमध्ये नाराजी निर्माण होऊ शकते. उलट सिद्धारमैया यांनाच कायम ठेवल्यास शिवकुमार यांच्याशी संबंधित वोक्कालिगा समाज आणिसंघटनात्मक यंत्रणेचा उत्साह कमी होण्याची भीती आहे.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांना चर्चेत सहभागी करून सामूहिक निर्णय घेण्याचे अश्वासन दिले आहे. २६ फेब्रूवारीच्या बैठकीनंतर दोन्ही नेत्यांनाही चर्चेसाठी बोलावले जाऊ शकते अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

# परळी रेल्वे सुरक्षा बलाचा १५ दिवसीय अग्नि सुरक्षा विशेष अभियान सुरु; प्रवासी सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य

प्रतिनिधी । परळी





प्रवासी सुरक्षेच्या दृष्टीने रेल्वे सुरक्षा बल (ठझऋ) परळी यांनी १५ दिवसीय अग्नि सुरक्षा विशेष अभियानाची जोरदार सुरुवात केली असून संपूर्ण स्थानक व प्रवासी गाड्यांमध्ये काटेकोर तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे.याचे नियोजन पोलिस निरीक्षक एस.बी. कांबळे सह,एम. किशोर, विजय लांडगे,गौतम दानवे यांच्या वतीने अभियान राबविले जात आहे. परळी रेल्वे स्थानकावर येणाऱ्या सर्व प्रवासी गाड्यांची सखोल तपासणी करण्यात येत असून अग्निसुरक्षेशी संबंधित प्रत्येक महत्त्वाच्या बाबीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. पार्सल व बुकिंग विभागात मालाची चुकीची घोषणा होऊ नये, वाहतुकीसाठी स्वीकारलेल्या दुचाकींमध्ये इंधन शिल्लक नसावे तसेच माल वाहतुकीसाठी निर्धारित पॅकेजिंग नियमांचे पालन केले जात आहे की नाही, याची तपासणी केली जात आहे.

तसेच प्रवासी गाड्यांमध्ये ज्वलनशील व स्फोटक पदार्थ, गॅस सिलिंडर, स्टोव्ह किंवा स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या धोकादायक वस्तूंवर कडक बंदी असल्याबाबत विशेष दक्षता घेतली जात आहे. गाड्यांमध्ये धूम्रपानास सक्त मनाई असून सिगारेट, बीडी, माचीस व लायटर वापरावरही नियंत्रण ठेवले जात आहे.यासोबतच डब्यांमध्ये सैल किंवा लटकलेले विद्युत तारा नसावेत, याचीही तपासणी करून संभाव्य अग्निधोक्यांना आळा घालण्याचा प्रयत्न केला जात आहे. रेल्वे सुरक्षा बलाने प्रवाशांना सहकार्य करण्याचे आवाहन करत सुरक्षा हीच सर्वोच्च सेवा असा संदेश दिला आहे.

# आहिल व अरहान याचा जीवनातील पहिला रोजा पुर्ण

प्रतिनिधी । धारूर



पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर धारूर येथील सामाजिक कार्यकर्ते सोफियान शेख यांच्या पुतण्या, आहिल व अरहान महेबूब शेख यांच्या अवघ्या ०६ वर्षांचा चिमुकले आहिल व अरहान महेबूब शेख हि दोघेने आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण करून कुटुंबासह परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.अतिशय लहान वयातही धार्मिक संस्कारांची जपणूक करत त्याने पूर्ण दिवस उपवास पाळला. घरातील मोठ्यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज अदा करून आणि कुरआन पठण ऐकत त्याने रोजाचा दिवस शांतपणे व्यतीत केला.

संध्याकाळी अजान होताच कुटुंबियांच्या उपस्थितीत खजूर व पाण्याने रोजा सोडण्यात आला. यावेळी कुटुंबियांनी आनंद व्यक्त करत अल्लाहचे आभार मानले व दोघेच्या उज्ज्वल भविष्यासाठी दुआ केली. शेजारी-पाजारी व नातेवाईकांनीही चिमुकल्याचे कौतुक करून त्याला शुभेच्छा दिल्या. अल्पवयातच इबादतीची आवड निर्माण होणे ही पालकांसाठी अभिमानाची बाब असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# मॉडर्न महाविद्यालयात राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती साजरी

## देव कर्मकांडात नव्हे तर मानवी सेवेत दडल्याची जाणीव गाडगे महाराजांनी करून दिली – प्राचार्य डॉ. नामदेव सानप

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

देव कर्मकांडात किंवा धार्मिक धोतंडामध्ये नव्हे तर तो मानवी सेवेत दडल्याची जाणीव राष्ट्रसंत गाडगे महाराज यांनी करून दिली असली तरी आजच्या आधुनिक युगात देव कर्मकंडात, धार्मिक थोतांड मध्ये आणि राजसत्तेमध्ये शोधला जात आहे अशी खंत प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांनी व्यक्त केली.

छत्रपती संभाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयात राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची १५० वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. सानप हे बोलत होते. यावेळी प्रा. डॉ. प्रज्ञा किवंडे प्रा. ज्योती मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी पुढे बोलताना डॉ. सानप म्हणाले की ,स्वातंत्र्यपूर्व कालखंडात सामाजिक शिक्षणाच्या अभावामुळे



समाजात विविध प्रकारच्या अंधश्रद्धाचा घट्ट प्रभाव होता त्यातून सामाजाची मुक्तता करून सामाजिक उत्कर्ष घडून आणण्यासाठी कठोर परिश्रम गाडगे महाराज यांनी घेतले. सामाजिक कार्यासाठी त्यांनी कोणत्याही प्रकारची संघटना, मठ, गड, आश्रम सुरू केला नाही. सामाजिक उत्कर्षाची पताका खांद्यावर घेऊन त्यांनी अंधश्रद्धेला कडाडून विरोध केला. स्वच्छतेला नैतिक व आध्यात्मिक मूल्य प्राप्त करून दिले. कीर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून सामाजिक संवाद साधला व देव कर्मकांडात किंवा धार्मिक थोतांडामध्ये दडलेला नाही तर तो मानवी सेवेत दडलेला आहे. याची जाणीव स्वतंत्र्यपूर्व कालखंडात करून दिली मात्र आजच्या आधुनिक युगातही देव कर्मकांडात आणि धार्मिक धोतंडामध्ये व राजसत्तेमध्ये शोधला जात आहे. अशी खंत व्यक्त करून अनेक थोर महात्मे, युगपुरुष व संत महात्म्यांच्या जन्मामुळे महाराष्ट्राची भूमी पावन भूमी म्हणून ओळखली जाते असे डॉ. सानप यांनी म्हटले .

प्रारंभी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेंद्र भगत यांनी केले. शेवटी प्रा. हर्षद वाघमारे यांनी आभार मानले. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी बहुसंख्य उपस्थित होते.

# ११ केव्ही वस्तीतील विद्युत पोलमध्ये करंट उतरला



## शेळीचा मृत्यू एमएसईबीच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे मोठी दुर्घटना !

परळी ।प्रतिनिधी

परळी शहरातील मिलिंद नगर परिसरात महावितरण (एमएसईबी) च्या गंभीर हलगर्जीपणामुळे मोठी जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली होती. ११ केव्ही वस्तीतील मुख्य रस्त्यालगत असलेल्या विद्युत पोलमध्ये वीजप्रवाह उतरल्याने एका निरपराध शेळीचा दुर्दैवी मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्षशील सावंत यांच्या घरासमोरील विद्युत खांबामधून करंट उतरला होता. या खांबाच्या संपर्कात आल्याने बायनाबाई कांबळे यांची शेळी जागीच ठार झाली. गोरगरीब कुटुंबासाठी शेळी हा उदरनिर्वाहाचा महत्त्वाचा आधार असल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

मिलिंद नगर येथील हा मुख्य रस्ता असल्याने येथे दिवसभर नागरिकांची वर्दळ असते. शाळकरी मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक यांची ये-जा सुरू असताना अशी जीवघेणी परिस्थिती निर्माण होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. या घटनेची तात्काळ चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व बायनाबाई कांबळे यांना त्वरित आर्थिक भरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे.



# ए.एच. वाडिया, सार्वजनिक वाचनालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

बीड ।प्रतिनिधी

येथील ए.एच. वाडिया, सार्वजनिक वाचनालयात दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वा. छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फोटो प्रतिमेस वाचनालयाचे कार्यकारी मंडळाचे संचालक ॲड. आनंद पाटील यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनुराग पांगरीकर, सरचिटणीस ॲड. गोविंट कासट, सह सचिव (अर्थ) डॉ. अजिंक्य पांडव, वाचक श्रीराम देशमुख, संतोष आगवान, आवचार, संतोष क्षीरसागर, विनायक साळुंके, आदीसह कर्मचारी वृंद सहा. ग्रंथपाल किशोर ठोसर, कुमार देशमुख, जगताप संतोष, जोशी बाळु, जाधव रामेश्वर, आदी बहुसंख्येने उपस्थित होते.

# ए.एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयात ह.भ.प. सुरेश महाराज जाधव यांचे व्याख्यान संपन्न

बीड । प्रतिनिधी

ग्रंथ हे जीवनासाठीचे उत्तम मार्गदर्शक असतातच, वाचेल तो वाचेल, हे सत्य आहेच. वाचन चळवळीचे स्वरूप बदलते आहे.. तेही स्वीकारले जाते. वाचनासोबतच ग्रंथाचा अभ्यास, चर्चा, चिंतन हा उपक्रम आपण हाती घेतलेला आहे. त्याअनुषंगानेच ए. एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयाच्या ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गात बुधवार दि. १८-०२-२०२६ रोजी सायं. ५.३० ते ६.३० या वेळेत वाचनालयाच्या सभागृहात न्यूज १८ चे जिल्हा प्रतिनिधी तथा ह.भ.प. सुरेश महाराज जाधव यांचे ज्ञानेश्वरीवर चिंतन संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पुजन प्रमुख व्याख्याते ह.भ.प. सुरेश महाराज जाधव, विश्वस्त मंडळाच्या उपाध्यक्षा डॉ. रोहिणीताई वैद्य, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनुराग पांगरीकर, सरचिटणीस ॲड. गोविंद कासट, प्रा. दिलीप गांधी, संचालिका सौ. निलीमाताई पाटंगणकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यानंतर



प्रमुख वक्ते ह.भ.प. सुरेश महाराज जाधव यांचे स्वागत विश्वस्त मंडळाच्या उपाध्यक्षा डॉ. रोहिणीताई वैद्य यांनी पुष्पगुच्छ देऊन केले.

यानंतर प्रमुख व्याख्याते ह.भ.प. सुरेश महाराज जाधव यांनी ज्ञानेश्वरी व्याख्यानमाला या मालेत ३३ वे पुष्प गुंफतांना ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्ययातील १२ ते १४ व्या श्लोकावर विस्तृतपणे निरुपण केले. आपल्या एक तासाच्या चिंतनात त्यांनी अनेक प्रकारचे दाखले देत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमास संजय चौसाळकर, डॉ. राम देशपांडे, अरुणकुमार समदाणी, श्रीकिशन जेथलिया, मुकुंद पाटील, सौ. स्नेहलता सुधील देशमुख, सौ. स्वाती धारुरकर, सौ. स्वाती पांडव, सौ. माया देशमुख, सौ. साधना ठोसर, डॉ. मंगेश वालेवाडीकर, श्रीराम देशमुख, यांच्यासह वाचक, सभासद, कर्मचारी वृंद आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

सदरील कार्यक्रम विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष श्री. अमोलकचंदजी सुराणा, उपाध्यक्षा डॉ. रोहिणीताई वैद्य, सदस्य ॲड. कालीदासनाना थिगळे, डॉ. हेमलता पाटील, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनुराग पांगरीकर, सरचिटणीस ॲड. गोविंद कासट यांच्यासह कार्यकारी मंडळातील पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रम यशस्वतेसाठी ग्रंथपाल ग्रंथमित्र गणेश शेंडगे, किशोर ठोसर, कुमार देशमुख, संतोष जगताप, रमेश जोशी, रामेश्वर जाधव यांनी परिश्रम घेतले.



# हरीश कुलकर्णी यांची परिपुर्ण संगीत सभा

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

संगीत साधना मंचच्या वतीने मासिक शास्त्रीय संगीत सभा रविवारी उत्साहात संपन्न झाली. लातुर येथील गायक हरीश कुलकर्णी यांनी राग पुरिया कल्याण ने गायनास प्रारंभ केला घराणेदार पारंपारिक बंदीश व शास्त्रशुद्ध राग मांडणी करून त्यांनी मैफिलीवर पकड मिळवली.

रागाची मांडणी त्यांनी गायनाच्या सर्व बाजूंनी परिपूर्ण अशी केली दुर्गा रागातील ईशस्तुती पर बंदिश सादर करून सुरेखा अभंग गायनाने मैफिलीची सांगता केली. तबल्यावर जयप्रकाश हरिदास तर हार्मोनियमवर विश्वजीत धाट यांनी साथ संगत केली.या संगीत सभेसाठी साधक, संगीत रसिक उपस्थित होते.

# सौ. के.एस.के. महाविद्यालयात न्यू होरायझन्स इन केमिकल अँड फिजिकल सायन्सेस राष्ट्रीय परिषदेचा समारोप संपन्न

बीड ।प्रतिनिधी

येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातन्यू होरायझन्स इन केमिकल अँड फिजिकल सायन्सेस या राष्ट्रीय परिषदेचा समारोप सोहळा नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. देशभरातील प्राध्यापक, संशोधक, संशोधक विद्यार्थी व उद्योग क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत ज्ञान-विनिमय, संशोधन सादरीकरणे आणि शास्त्रीय चर्चांना उंची प्राप्त झाली.

या परिषदेसाठी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील रसायनशास्त्र विभागात कार्यरत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्रा. डॉ. भास्कर साठे तसेच विख्यात अकॅडेमिशियन व फॅकल्टी मेंबर प्रा. प्रभाकर उंद्रे उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे परिषदेला विशेष बौद्धिक



अधिष्ठान लाभले.

समारोप समारंभाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर तर प्रमुख अतिथी म्हणून कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी येथील प्राचार्य प्रा. रवींद्र कठारे व प्रा. प्रभाकर उंदरे हे उपस्थित होते.

याप्रसंगी नवगण शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे व डॉ. विश्वंभर देशमाने, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्त विभाग प्रमुख डॉ. खान ए.एस. यांची प्रमुख उपस्थिती होती. या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांचे सदस्य, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थ्यां व प्रा.डॉ. लक्ष्मण गाडेकर, प्रा. रुपेश कोकाटे, प्रा. दीपक पवार, प्रा. विकास पवार, प्रा. कीर्ती पांडुळे, यांचे विशेष योगदान लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन असे सत्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. सतीश माऊलगे यांनी केले तसेच प्रा. डॉ. अशोक डोंगरे यांनी कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले.



# आम आदमी पार्टीच्या वतीने राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती पुष्पहार घालून साजरी

बीड ।प्रतिनिधी

अंधश्रद्धा, अस्वच्छता आणि अज्ञान यांनी ग्रासलेल्या समाजाला कीर्तनाच्या माध्यमातून सुधारण्याचे कार्य प्रभावीपणे पार पाडणारे थोर समाजसुधारक आणि स्वच्छता अभियानाचे जनक राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांना जयंती निमित्त पुष्पहार घालून विनम्र अभिवादन केले.यावेळी आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे, डॉ गणेश ढवळे, बाळासाहेब मोरे पाटील,किस्किंदा पांचाळसह इतर सामाजिक, राजकीय कार्यकर्ते सहभागी होते.

# संत गाडगेबाबांच्या जयंतीनिमित्त शिवसंग्रामच्या वतीने कॅनॉल रोड परिसरात स्वच्छता अभियान संपन्न



बीड ।प्रतिनिधी

आज समाजसुधारक संत गाडगे बाबा यांच्या जयंतीनिमित्त शिवसंग्रामच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. अंबिका चौक ते पोस्टमन कॉलनी, कॅनॉल रोड परिसरात ही स्वच्छता माहिम राबवण्यात आली. याउपक्रमातून गाडगेबाबांच्या स्वच्छता व समाजप्रबोधनाच्या परंपरेचा खरा आदर्श जपण्यात आला.या स्वच्छता मोहिमेचे आयोजन शिवसंग्रामच्या महिला शहराध्यक्ष संगीता ठोसर व शिवसंग्राम नेते हरिश्चंद्र ठोसर यांच्या पुढाकाराने करण्यात आले. स्वच्छता हीच खरी सेवा हा संदेश आचरणात आणत परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.संत गाडगेबाबांनी दिलेला स्वच्छतेचा संदेश लोकनेते विनायक मेटे यांनी बीड परिसरात बिंदुसरा स्वच्छता मोहीम तसेच शहर स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून जोपासला होता. त्याच वसा-वारशाने प्रेरित होऊन ठोसर दांपत्याने ही मोहीम यशस्वीरीत्या पार पाडली.या स्वच्छता मोहिमेला शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले. त्यांच्या समवेत शिवसेनेचे शहराध्यक्ष सुहास पाटील, कैलास शेजाळ तसेच अशोक लोकरे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी स्वच्छतेबाबत जनजागृती करत नागरिकांना परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश पसरला असून स्वच्छता अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## जॉन डिअर या आंतरराष्ट्रीय कंपनीमध्ये यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन,

# बीडच्या ५१ विद्यार्थ्यांची ट्रेनी इंजिनीयर पदावर निवड

बीड ।प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीडच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा यशाची नवी उंची गाठली आहे. नामांकित आंतरराष्ट्रीय कंपनी जॉन डिअर ली.पुणे (गेहप ऊाशीश) मध्ये महाविद्यालयातील तब्बल ५१ विद्यार्थ्यांची ३.२० लाख प्रति वर्ष इतक्या वेतनावर ट्रेनी इंजिनीयर या पदावर निवड झाली आहे. यामध्ये मेकॅनिकल शाखेतील २३ विद्यार्थी व इलेक्ट्रिकल शाखेतील २८ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे.

महाविद्यालयात आयोजित कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह दरम्यान विद्यार्थ्यांनी लेखी परीक्षा, तांत्रिक मुलाखत आणि एचआर मुलाखत यशस्वीरीत्या पार केली. त्यांच्या



तांत्रिक ज्ञान, प्रात्यक्षिक कौशल्य आणि संवाद कौशल्याच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी साध्य झाली.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बापुराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष प्रकाश (दादा) सोळंके साहेब, उपाध्यक्ष अमरसिंह (भैय्यासाहेब) पंडित साहेब, सचिव सतिश (भाऊ) चव्हाण, प्राचार्य.डॉ.बापूराव मारलापल्ले, टी.पी.ओ प्रा.धुमाळ बी.आर, शैक्षणिक समन्वयक केंद्रे बी.ए,


मेकॅनिकल शाखेचे विभाग प्रमुख प्रा. मोमिन आय.एल, इलेक्ट्रिकल शाखेच्या विभागप्रमुख प्रा. मोरे डी.एन, प्रा.जाधव पी. व्ही, प्रा. राऊत टी. के, प्रा. शेख एफ.जे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# चौसाळा ग्रामपंचायतमध्ये राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी



बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथील ग्रामपंचायत कार्यालयात राष्ट्र संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.प्रथमतः कुळवाडी भुषण राजाधिराज छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस सामाजिक कार्यकर्ते पप्पू पवार यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य किशोर ढोकणे, ग्रामपंचायत सदस्य सुरज सोनवणे, ग्रामपंचायत सदस्य कोंडीराम जोगदंड, चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर,शिवाजी जोगदंड, संभाजी जोगदंड, लखन जोगदंड, दादाराव ढोकणे,इसाक सय्यद, महेश पवार, आप्पा नाईकवाडे इत्यादी



बीड - महामानवा अभिवादन ग्रुप बीड कडून राष्ट्रसंत संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना महामानव अभिवादन ग्रुपचे सदस्य.




बीड ।प्रतिनिधी

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल, तेलगाव रोड, बीड येथे राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती कदम एस. डी., प्राथमिकचे मुख्याध्यापक राऊत आर. टी. तसेच राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीमती लोखंडे आर. डी. यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन के. बी.सोंडगे यांनी केले तर आभार प्रदर्शन डी. एल. तिडके यांनी केले.

# राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये संपन्न



बीड /प्रतिनिधी

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यालयांमध्ये राष्ट्रसंत गाडगे महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी ए हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी राष्ट्रसंत गाडगे महाराज स्वच्छता अभियान अंतर्गत मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय परिसर स्वच्छ करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रसंत गांडगे महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांच्या अभिवादन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संतोष मेश्राम, यु.बी. पवळ यांनी व्यापक आणि व्यासंगी विचार प्रतिपादन केले. याप्रसंगी मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांनी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रगल्भता आणि सामाजिक व्यक्तिमत्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे संचालन संतोष मेश्राम, प्रास्ताविक श्रीमती एन.जी. मुंडे आणि आभार प्रदर्शन आर.बी. घुले यांनी केले. याप्रसंगी बहुसंख्य विद्यार्थी आनंद छात्रालयाचे अधीक्षक डी.व्ही. खरसाडे , सय्यद सर, वाघमारे सर, एस.एस. गायकवाड, एल.बी. हजारे उपस्थित होते.

# धर्माबाद तालुक्यात दहावीच्या परीक्षेला प्रारंभ तीन केंद्रावर ११०० परीक्षार्थी

## तहसीलदार सौ सुरेखा स्वामी, गटविकास अधिकारी रवीकुमार क्षीरसागर, गटशिक्षणाधिकारी रविशंकर मरकंटे यांची भेट

धर्माबाद / अशोक पडोळे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शाळां प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी मार्च २०२६ अंतर्गत धर्माबाद तालुक्यात २० फेब्रुवारी रोजी इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त अभियानांतर्गत परीक्षांना शिस्तबद्ध वातावरणात प्रारंभ झाल्या. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले तसेच जिल्हा शिक्षण अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार कॉपीमुक्त अंतर्गत परीक्षा सुरू आहेत. धर्माबाद तालुक्यातील परीक्षा केंद्रावर ११०० विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत.

केंद्रनिहाय धर्माबाद शहरातील सर्वात मोठ्या जुन्या ६१ वर्षापासून हुतात्मा पानसरे हायस्कूल धर्माबाद या केंद्रावर ५०० विद्यार्थी परीक्षेला बसली असून येथे केंद्रप्रमुख आबासाहेब उसकलवार यांच्या मार्गदर्शनानुसार केंद्र संचालक बेंबरेकर एस. के. सह केंद्र संचालक पुलकंठवार एम.व्ही. सहकारी जाधव एस.टी.मुजळगे व्ही. व्ही. तर जिजामाता हायस्कूल येथे २९९ विद्यार्थी परीक्षा देत आहेत येथे केंद्र संचालक मेशेट्टी सर यांनी आहेत तर तिसरे जिल्हा परिषद हायस्कूल येथे ३९१ विद्यार्थी परीक्षार्थी म्हणून परीक्षा देत आहेत केंद्र संचालक सौ खानापूरकर या काम करत आहेत. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या कॉपीमुक्त अभियाना अंतर्गत थेट देखरेख ठेवली जात असून सकाळी १०.३० वाजता पासून विद्यार्थी परीक्षा केंद्र प्रवेश देण्यात येत असून तत्पूर्वी नियमानुसार शाळेतील शिक्षकाकडून विद्यार्थ्यांची कसून तपासणी हॉल तिकीट व ओळखपत्र ची पडताळणी करण्यात येत आहे. केंद्र परिसरात धर्माबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सदाशिव भरडीकर यांनी बंदोबस्त ठेवला असून अनाधिकृत व्यक्तींना प्रवेश बंदी करण्यात आली आहे धर्माबाद शहरातील शालांत प्रमाणपत्र परीक्षा कॉपीमुक्त अभियानांतर्गत भयमुक्त परीक्षा सुरू आहेत.

# राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे उद्घाटन संपन्न

मुक्रामाबाद ।प्रतिनिधी

मुक्रामाबाद येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष वार्षिक शिबिर दि. २२ फेब्रुवारी २०२६ ते २८ फेब्रुवारी २०२६ या काळात मौजे गोनेगाव ता.मुखेड जि. नांदेड येथे संपन्न होत आहे.

या शिबिराचे उद्घाटन दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोणेगाव येथे झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अनुसया शिक्षण प्रसारक मंडळ गोजेगावचे अध्यक्ष रामचंद्रराव (बबन) पाटील गोजेगावकर हे उपस्थित होते. तर या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून प्राचार्य विवेक इनामदार, सरपंच सौ लक्ष्मीबाई भाऊराव डोरनाळे, उपसरपंच विमलबाई दिंडे,पोलीस पाटील विष्णुपंत गंदिगुडे,



मुख्याध्यापक धरणे पांडूरंग, शिवराज पाटील गोजेगावकर,अनिल बालाजी पाटील,दिपक खेगटे हे उपस्थित होते. तसेच सहशिक्षक काशिनाथ राठोड, ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर श्रीमंगले, शालेय समिती अध्यक्ष गोविंद दिंडे, अमृतराव दिंडे, संजय डोरनाळे, नवसाजी पाटील,बालाजी पाटील, आर्चनाताई डोरनाळे,मनिषा डोरनाळे,शिलाताई राजूरे, फुलाबाई डोरनाळे , राजेश्री कांबळे,हनमंत नागरवाड,राजूरे ज्ञानेश्वर,दिंडे विठ्ठल,सदानंद नागरवाड, कपिल पाटील,माधव बोईनवाड,नरसिंग राजूरे, माधव दिंडे,शादुल शेख, विठ्ठल ग्यानोबा देवकत्ते (ग्रा.संदस्य) चंद्रकांत देवकत्ते,विठ्ठल चांदोबा देवकत्ते, शेषेराव रामराव देवकत्ते,मष्णाजी डोरनाळे (सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी), सुधाकर नागरवाड, गोविंद दिंडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ मा. म. गायकवाड यांनी केले तर प्रास्ताविक स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विवेक इनामदार यांनी केले.या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप रामचंद्र (बबन) व्यंकटराव पाटील यांनी केला.या कार्यक्रमास स्वामी विवेकानंद महाविद्यालय मुक्रमाबाद येथील रासेयो स्वयंसेवक-स्वयंसेविका,शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारीवर्ग उपस्थित होते. उपस्थितांचे आभार डॉ मादळे रामदास यांनी मानले.

# चिमुकल्यांची श्रद्धा अन जिद्द

## तलाह व हमजा शेख यांचा पहिला रोजा यशस्वी पूर्ण

आष्टी - (प्रतिनिधी) मुस्लिम धर्मातील पवित्र रमजान महिन्याला अत्यंत अनन्यसाधारण महत्त्व आहे. संयम, त्याग, प्रार्थना आणि आत्मशुद्धीचा संदेश देणाऱ्या या महिन्यात मुस्लिम बांधव रोजा (उपवास) पाळून अल्लाहची इबादत करतात. इस्लाम धर्मानुसार लहान मुलांना रोजा सक्तीचा नसला तरी घरातील मोठ्यांचे अनुकरण करत अनेक चिमुकलेही उत्साहाने आणि श्रद्धेने रोजा पाळतात.

याच प्रेरणादायी भावनेतून आष्टी शहरातील दारू गल्ली परिसरातील रहिवासी शेख आसिफ यांचा सुपुत्र तलाह आसिफ शेख (वय ६ वर्षे, इयत्ता पहिली) आणि शेख अफजल यांचा सुपुत्र हमजा अफजल शेख (वय ९ वर्षे, इयत्ता तिसरी) या दोन्ही भावंडांनी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे.

यावर्षीचा पवित्र रमज़ान महिना १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळपासून सुरू झाला. त्यानंतर शुक्रवार दि. २० फेब्रुवारी रोजी पहिला रोजा पाळण्यात आला. या दिवशी तलाह आणि हमजा या दोन्ही चिमुकल्यांनी दिवसभर अन्नाचा कणही न घेता आणि पाण्याचा थेंबही न पिता अत्यंत श्रद्धेने आणि संयमाने रोजा पूर्ण केला. एवढ्या लहान वयात त्यांनी दाखविलेली जिद्द आणि धार्मिक भावना सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. घरातील धार्मिक वातावरण, पालकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबातील मोठ्यांचे अनुकरण यामुळे या दोन्ही मुलांमध्ये लहानपणापासूनच संस्कारांची जपणूक होत असल्याचे दिसून येते. रोजा पूर्ण केल्यानंतर संध्याकाळी इफ्तारच्या वेळी कुटुंबियांनी त्यांचे कौतुक केले. नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांनीही या दोन्ही चिमुकल्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. लहान वयातच श्रद्धा, संयम आणि शिस्तीचे धडे आत्मसात करणारे तलाह आणि हमजा यांचे हे पाऊल निश्चितच इतर मुलांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. रमज़ान महिन्यातील हा त्यांचा पहिला रोजा त्यांच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय आणि आनंददायी क्षण ठरला आहे.





बीड - गुरुनानक प्राथमिक विद्यालय शाहूनगर बीड येथे संत गाडगेबाबा जयंती निमित्त शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए. यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून विद्यार्थ्यांनी शाळेचा सर्व परिसर स्वच्छ केला.यावेळी गदळे आर. ए. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# कृषी क्षेत्रात 'एआय' आणि डिजिटल पायाभूत सुविधांचा वापर आवश्यक

## पशुसंवर्धन सचिव एन. रामास्वामी




मुंबई ।प्रतिनिधी

जागतिक स्तरावर भारतीय कृषी उत्पादनांची विश्वासार्हता वाढवण्यासाठी 'ट्रेसिबिलिटी' (शोधक्षमता) ही प्रणाली डिजिटल पायाभूत सुविधा म्हणून राबवणे आवश्यक असल्याचे मत पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव एन. रामास्वामी यांनी व्यक्त केले.

'महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९' धोरणातंर्गत 'जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन', एआय फॉर अॅग्री २०२६ या परिषदेत 'कृषी-एआय साठी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा' या विषयावरील परिसंवाद मध्ये सचिव एन.रामास्वामी बोलत होते, यावेळी ट्रस्ट झिरो वनचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी प्रबीर मिश्रा, 'आयआयएमडीए'चे ट्रेड ट्रस्ट, सिंगापूरचे उपसंचालक चेंग केन वेई, बेटर कॉटन, इंडियाच्या भारतातील संचालक श्रीमती ज्योती नारायण कपूर, जर्मनी दूतावासच्या कृषी व अन्न विभाग प्रमुख व्होल्कर क्लिमा, रबर बोर्डचे कार्यकारी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी एम. वसंतगेसेन यांनी सहभाग घेतला.

# जागतिक महिला दिनानिमित्त राज्यस्तरीय नारी सन्मान आदर्श पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवा - अविनाश कदम

आष्टी - (प्रतिनिधी) जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यंदाही आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने राज्यस्तरीय नारी सन्मान आदर्श पुरस्कार २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करणाऱ्या महिलांचा या पुरस्काराद्वारे गौरव करण्यात येणार असून, तालुक्यातील तसेच राज्यभरातील पात्र महिलांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. समाजाच्या सर्व स्तरांवर कार्यरत असलेल्या महिलांच्या कर्तृत्वाला योग्य व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कार्याची दखल राज्यस्तरावर घेतली जावी आणि नव्या पिढीला प्रेरणा मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी दिली.

या पुरस्कारासाठी आदर्श माता, सामाजिक कार्य, शिक्षण, वैद्यकीय, कृषी, पशुवैद्यकीय, अभियांत्रिकी, प्रशासकीय अधिकारी, पोलीस, वकील, क्रीडा, उद्योजिका, सीईओ, मॅनेजर, अकाउंटंट, क्लार्क, बँकिंग, पत्रकारिता, अध्यात्म, साहित्य, राजकीय, ग्रामसेविका, तलाठी, सरपंच, आशावर्कर, नर्स, अंगणवाडी/बालवाडी सेविका, कृषी सहाय्यक, वायरमन, बचत गट, चित्रपट कला, नर्तिका कलाकार, लेडीज टेलर, आदर्श ब्युटी पार्लर संचालिका, आदर्श गृहिणी, आदर्श सासू, आदर्श सून अशा विविध क्षेत्रांतील महिलांकडून प्रस्ताव स्वीकारले जाणार आहेत. याशिवाय इतर कोणत्याही क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांनाही अर्ज करता येणार आहे.

इच्छुक महिलांनी आपण करीत असलेल्या कार्याची माहिती, वृत्तपत्र कात्रणे, मागील पुरस्कारांच्या छायाचित्रांच्या प्रती तसेच आवश्यक अर्जासह आपला सविस्तर प्रस्ताव तयार करून ५ मार्च २०२६ किंवा तत्पूर्वी समक्ष अथवा सुचकामार्फत पुढील व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. प्राप्त प्रस्तावांमधून पात्र आणि योग्य उमेदवारांची निवड करून त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण सोहळ्याची तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल.

अधिक माहितीसाठी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांच्याशी ९४२३३९५४४४ किंवा ८९७५३५७०५७ या क्रमांकावर संपर्क साधावा. तालुक्यातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या जास्तीत जास्त महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि आपल्या कर्तृत्वाची नोंद राज्यस्तरावर व्हावी, असे आवाहन संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, सचिव गहिनीनाथ पाचबैल, निसार शेख, ड. किशोर निकाळजे, राजेंद्र लाड, समीर शेख, अतुल जवणे, सय्यद बबलू,




अक्षय विधाते, संतोष नागरगोजे, प्रेम पवळ, सोपान पगारे, मारूती सत्रे, आदिनाथ ठोंबरे आणि अर्थव डाडर यांनी संयुक्तपणे केले आहे.

# कडक उन्हातही जिद्दीने सात वर्षीय मुस्कानचा पहिला रोजा पूर्ण

आष्टी - (प्रतिनिधी) पवित्र रमजान महिन्याला प्रारंभ झाला असून, श्रद्धा, संयम आणि आत्मशुद्धीचा संदेश देणाऱ्या या महिन्यात मोठ्यांसोबतच लहान मुलांमध्येही उपवास करण्याची जिद्द दिसून येत आहे. आष्टी तालुक्यातील उंदरखेल येथील सात वर्षीय मुस्कान सिराज शेख हिने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा रविवार दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी यशस्वीपणे पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

वयाने लहान असतानाही मुस्कानने पहाटेच्या सहरीपासून ते सायंकाळच्या इफ्तारपर्यंत अन्नाचा कण आणि पाण्याचा थेंबही न घेता अत्यंत संयमाने व श्रद्धेने रोजा पूर्ण केला. कडक उन्हाच्या झळा सहन करत तिने दाखविलेली चिकाटी आणि आत्मविश्वास सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. मुस्कानने पहिला रोजा पूर्ण केल्याने शेख कुटुंबात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. तिचे वडील सिराज शेख तसेच कुटुंबीयांनी तिचे विशेष कौतुक केले. नातेवाईक



आणि मित्रपरिवाराकडूनही मुस्कानवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून तिच्या या जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत आहे. लहान वयात धार्मिक संस्कार आणि संयमाची जाणीव ठेवत मुस्कानने पूर्ण केलेला हा पहिला रोजा समाजातील इतर मुलांसाठीही प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

# हातोला गावावर शोककळा : कै.बाबासाहेब गर्जे यांचा अंत्यविधी शोकाकुल वातावरणात संपन्न

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील हातोला ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच यांचे पती तथा मा. पंचायत समिती सदस्य कै. बाबासाहेब ज्ञानदेव गर्जे यांच्या अकाली निधनाने हातोला गावासह पंचक्रोशीवर दुःखाची छाया पसरली आहे. समाजकार्यात नेहमी अग्रेसर असलेल्या या मनमिळावू व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

सोमवार दि. २३ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता हातोला येथील गर्जे वस्ती येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधी अत्यंत शोकाकुल वातावरणात पार पडला. गावकरी, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांनी अखेरचा निरोप दिला.

कै. बाबासाहेब गर्जे यांनी पंचायत समिती सदस्य म्हणून कार्य करताना सर्वसामान्य जनतेशी आपुलकीचे व जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित केले होते. गावाच्या विकासासाठी त्यांनी



सातत्याने प्रयत्न केले. साधी राहणी, स्पष्टवक्तेपणा, शांत, संयमी आणि समाजहिताची तळमळ ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. त्यामुळेच त्यांच्या निधनाने हातोला गावात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

यावेळी ह.भ.प. अशोक महाराज, ह.भ.प. रोहिदास महाराज, ह.भ.प. किशोर महाराज, मा. जिल्हा परिषद सदस्य देविदास धस, महेश कारखान्याचे चेअरमन राजेंद्र धोंडे, मा. जिल्हा परिषद अध्यक्ष विजय गोल्हार, एन. टी. गर्जे, मा. जिल्हा परिषद सदस्य शिवाजी नाकाडे, मा. उपसभापती आदिनाथ सानप, ड. भाऊसाहेब लटपटे, सरपंच दत्तात्रय खोटे, मा. उपसभापती आत्माराम फुंदे, सरपंच विठ्ठल राख, सरपंच शिवाजी गर्जे, सरपंच अभय गर्जे, इंद्रजीत गर्जे, पत्रकार समीर शेख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी कै. बाबासाहेब गर्जे यांच्या पार्थिवावर पुष्पगुच्छ अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले व दोन भाऊ असा परिवार आहे. कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून ग्रामस्थांनी त्यांना धीर दिला. हातोला व पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अश्रुपूर्ण डोळ्यांनी या लोकाभिमुख नेत्याला अखेरचा निरोप दिला. कै. बाबासाहेब गर्जे यांच्या निधनाने समाजकारणातील एक जिद्दी, कार्यक्षम व लोकाभिमुख नेतृत्व हरपले असून त्यांच्या आठवणी ग्रामस्थांच्या मनात सदैव जिवंत राहतील.

# भवरवाडी जिल्हा परिषद शाळेचा कलाविष्कार वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा दिमाखात संपन्न

आष्टी - (राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील भवरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गुरुवार दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता कलाविष्कार वार्षिक स्नेहसंमेलनाचा भव्य आणि उत्साहपूर्ण सोहळा पार पडला. शाळेला आधार गावाचा, गावाला अभिमान शाळेचा या ब्रीदवाक्याची प्रचिती देणारा हा कार्यक्रम ग्रामस्थ, पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत रंगला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराज यांची आरती करून मान्यवरांच्या शुभहस्ते सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांनी साकारलेल्या आकर्षक रांगोळ्या, अक्षररचना आणि शैक्षणिक प्रदर्शनाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. संपूर्ण शाळा परिसर सुशोभित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये देशभक्तीपर गीत, समूह नृत्य, लघुनाटिका, शिवचरित्रावरील सादरीकरण, लोककला सादरीकरण आदींचा समावेश होता.

याप्रसंगी युवा नेते जयदत्त भैय्या धस यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, गावागावातील शाळा सुधारल्या तर गावाचा सर्वांगीण विकास होतो. आण्णांच्या व्हिजनमध्ये असलेली भवरवाडी शाळा कशी कार्यरत आहे हे पाहण्यासाठी मी येथे आलो आहे. येथे येऊन शाळेतील शिस्त, गुणवत्ता आणि सर्जनशीलता पाहून मला समाधान वाटले. त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये मोठी क्षमता असून योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ते उच्च पदांवर पोहोचू शकतात, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन धस यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, गावातील शाळा मजबूत झाल्या तर समाजाची पायाभरणी भक्कम होते. जिल्हा परिषद शाळा उत्कृष्ट कार्य करत आहेत आणि भवरवाडी शाळा हे त्या कामाचे जिवंत उदाहरण आहे. त्यांनी शिक्षकांच्या प्रयत्नांचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच संस्कारही जोपासावेत, असे मार्गदर्शन केले.

विजयनगरचे अभ्यासक एन. शहाजी हंपी यांनी शाळेतील रांगोळी आणि अक्षरकलेचे विशेष कौतुक करत सांगितले, अक्षरावर प्रेम करणारी, रांगोळीवर प्रेम करणारी अशी ही शाळा आहे. येथे पाहिलेली रांगोळी अक्षररचना आणि सृजनशीलता पाहून मी पुण्यावरून येथे आलो. त्यांच्या या वक्तव्याने विद्यार्थ्यांमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली.

शिवचरित्रकार लेखक तथा व्याख्याते गणेश भाऊ धालपे यांनी आपल्या ओजस्वी भाषणात सांगितले, छत्रपती शिवाजी महाराज हेच खरे महाराष्ट्राचे दैवत आहेत. शिवचरित्रातील प्रेरणादायी प्रसंग सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना धैर्य, स्वाभिमान आणि



देशभक्तीचे धडे दिले.

तसेच प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे यांनी सांगितले की, भवरवाडी शाळा ग्रामीण भागातील असून देखील तसेच कमी पट संख्या असून देखील एवढा मोठा सांस्कृतिक कार्यक्रम घेत आहे ही बाब अतिशय कौतुकास्पद आहे. याबद्दल त्यांनी शाळेच्या सर्व शिक्षकांचे व ग्रामस्थांचे विशेष अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मधुकर गळगटे सर यांनी प्रभावी आणि बहारदार शैलीत केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पूर्वी भवर, अक्षरा भवर, सानिका भवर, मुख्याध्यापक सुनील काकडे सर यांनी नियोजनबद्ध परिश्रम घेतले. शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कार्यक्रमाची उत्कृष्ट तयारी करून घेतली. या सोहळ्यास सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, सर्व सदस्य, शिक्षणप्रेमी नागरिक, माता-भगिनी, युवक वर्ग तसेच शाळेतील बालगोपाल मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे मनापासून कौतुक केले. कलाविष्कार स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून भवरवाडी शाळेने केवळ सांस्कृतिक कार्यक्रमच सादर केला नाही, तर ग्रामीण शिक्षणाच्या गुणवत्तेचा आदर्शही समाजासमोर ठेवला. गावाच्या विकासासाठी सक्षम शिक्षण हीच खरी गुरुकिल्ली असल्याचा संदेश या कार्यक्रमातून अधोरेखित झाला. भवरवाडी शाळेचा हा उपक्रम निश्चितच इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

# गोदावरी नदीपात्रात नांदेड ग्रामीण पोलीसांनी अवैध रेती उपसा ठिकानावर एकाच वेळी पाच ठिकाणी छापा कारवाई

## एकुण २,६३,२५,०००/-रुपयाचा मुद्देमाल जप्त

नवीन नांदेड -गोदावरी नदीच्या पात्रात एकच वेळी पाच ठिकाणी छापा कार्यवाही करून अवैध रित्या वाळू उपसा करणाऱ्या अनेक जणा विरुद्ध ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही करून २,६३,२५,००० मुद्देमाल जप्त केला असुन गुन्हा दाखल करण्यात आला असून या कार्यवाही प्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन अधिकारी कर्मचारी यांच्ये अभिनंदन केले आहे पोलीसांनी दिलेल्या माहिती पत्रकार नुसार,पोलीस ठाणेनांदेड ग्रामीण गुरन १६२/२०२६ कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं, सहकलम ४८ (७).४८(८) महराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ९,१५ पर्यावरण संरक्षण अधिनियम व कलम ३,७ सार्वजनिक संपती नुकसान प्रतिबंधक अधिनियमगुन्हा घडला तारीख वेळ व ठिकाण गोपनीय माहीती वरून दिनांक २२ फेब्रुवारी रोजी वेळ १५.३० वाजता मौ. वांगी, इंजेगाव, नागापुर, सिध्दनाथ, पुणेगाव, हद्दीतील गोदावरी नदीपात्रात फिर्यादीचे नाव व पत्तागवेंद्र गंगाधर सिरमलवार व्यवसाय पोकॉ/ नेमणुक पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीन गुन्हा दाखल तारीखदिनांक २३/०२/ २०२६ रोजी ०४.५१ यांचे मार्गदर्शनाखाली अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक, भोकर सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड मा. श्री प्रशांत शिंदे, उप विभागीय पोलीस अधिकारी, इतवारा

गुन्हा उघडकीस अणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोउपनि कुसमे, पोउपनि भिसे, पोहेकॉ जाधव, पोहेकॉ/ केंद्रे, पोकॉ/गवेंद्र सिरमलवार, पोकॉ/शंकर, पोकॉ शेख समीर, पोकॉ/ चावरे सर्व नेमणुक पो.स्टे. नांदेड ग्रामीण.आरोपीचे नाव१ ) करण सोनटक्के २) शहाजी सोनटक्के ३) छगन चुकतरे सर्व रा. ब्राम्हणवाडा ४) गजानन म्हस्के रा. नागापुर व इतरअनोळखी ०७ इसमजप्त मुद्देमाल / एकूण मुद्देमाल१) पाच मोठ्या लोखंडी बोटी प्रती बोट किंमत ३०,००,०००/-रू असे एकुन १,५०,००,०००/-रू. २) पाच मध्यम लोखंडी बोटी (फायबर बोटी) इंजिनसह प्रती बोट किंमत अंदाजे १५,००,०००/-रू असे एकुन ७५,००,०००/-रू ३) अंदाजे ८५ ब्रास रेती (वाळु) किंमत ४,२५,०००/- रुपये, ४) तिन इंजन ९,००,०००/- रूपये ५) एकुन ५० तराफे २५,००,०००/- रूपये असा एकुण २,६३,२५,०००/-रू मुद्देमाल

थोडक्यात हकीकत अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैधरित्या गौण खनिज (रेती) उपसा व वाहतुक करणारे लोकांवर कारवाई करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे.

त्या अनुषंगाने ओमकांत चिंचोलकर, पोलीस निरीक्षक पो.स्टे. नांदेड ग्रामीण हे दिनांक २२ फेब्रुवारी२६ रोजी वरील अधिकारी व अंमलदार यांचे सह पो.स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना १४.०० वाजता गोपनीय माहिती मिळाली की, मौ. वांगी, इंजेगाव, नागापुर, सिध्दनाथ, पुणेगाव, परीसरातील गोदावरी नदीपात्रात बोटी, इंजीन व तराफेच्या साहयाने अवैध रेती उपसा करूण साठवणुक होत आहे अशा माहीती वरूण वरील अधिकारी व अंमलदार असे मौ. वांगी, इंजेगाव, नागापुर, सिध्दनाथ, पुणेगाव, हद्दीतील गोदावरी नदीपात्रात वेळ अंदाजे १४.३० ते २४.०० वाजता पर्यत सलग १० तास पाच ठिकाणी छापा करवाई केली असता नदी पात्रातुन बोटी, तराफे व इंजीनच्या सहयाने रेती काढणारे अनोळखी सात आरोपी पोलीसांना पाहुन पळुन गेले, सदर कार्यवाही मध्ये मिळुन आलेल्या मुद्देमाला बाबत चौकशी केली असता सदरचा मुद्देमाल हा आरोपी नामे १) करण सोनटक्के २) शहाजी सोनटक्के ३) छगन बुकतरे सर्व रा. ब्राम्हणवाडा ४) गजानन म्हस्के रा. नागापुर यांचा असल्याचे समजले. सदर नदी पात्रात मिळुन आलेले वरील नमुद बोटी,तराफे व इंजीन घेवुन येणे शक्य नसल्याने जागीच पंचा समक्ष हायड्रोजन



गैस कटरचे साहाय्याने कट करूण जाळुन तोडुन बुडवुन, नाश केले व नदी किनारी साठवुन ठेवलेली रेती पंचा समक्ष जप्त करूण खाजगी वाहणाने पो.स्टे.ला आनुन जमा केली आहे.

वरील चार व अनोळखी सात असे एकुन ११ आरोपी विरूध्द कलम ३०३(२), ३(५) भा. न्या. सं, सहकलम ४८ (७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९ व १५, सार्वजनिक संपती नुकसान प्रतिबंधक अधिनियम ३७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगीरीचे अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी कौतुक केले आहे.

# कॉपीमुक्त अभियानाला शिक्षणातील गुणवत्तेची जोड आवश्यक

किनवट प्रतिनिधी (कचरू जोशी) दि. २३ : नांदेड जिल्ह्यात मागील वर्षापासून कॉपीमुक्त बोर्डाच्या परीक्षा राबविण्यात येत असल्याने अनेक पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. विद्यार्थ्यांनी 'कॉपी करून पास होणे' या मानसिकतेतून बाहेर पडणे काळाची गरज असल्याचे मतही व्यक्त होत आहे. मात्र केवळ कठोर अंमलबजावणी करून कॉपीमुक्ती साध्य होणार नसून त्यासाठी शैक्षणिक पातळीवर भक्कम पाया घालणे तितकेच आवश्यक असल्याची भूमिका नागरिकांतून मांडली जात आहे.शासनाने इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत 'नापास न करण्याची' पद्धत अवलंबल्या मुळे विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत उणीवा राहिल्या आहेत. या पद्धतीचा पुनर्विचार करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे असल्याची मागणी होत आहे. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना शिक्षणाव्यतिरिक्त इतर प्रशासकीय कामांमधून मुक्त करून त्यांना अध्यापनासाठी अधिक वेळ देण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच काही शिक्षकांनी राजकारण, गुत्तेदारी, व्यवसाय किंवा इतर सामाजिक-राजकीय कामांमध्ये गुंतून न राहता विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत, अशीही भावना पालकांतून उमटत आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, शर्यतीत धावणाऱ्या घोड्यांना आधी आवश्यक पोषण, प्रशिक्षण व तयारी दिली जाते; त्यानंतरच त्यांना शर्यतीत उतरवले जाते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त परीक्षेला सामोरे जाण्यापूर्वी संपूर्ण अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करणे, नियमित सराव परीक्षा घेणे, प्रत्येक विद्यार्थ्यांच्या शंका-कुशंका दूर करणे आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवणे ही जबाबदारी शिक्षकांनी पार पाडली तरच कॉपीमुक्त उपक्रमाला खरा अर्थ प्राप्त होईल.

वरिष्ठ अधिकारी कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी शिक्षकांना तंबी देत आहेत, काही ठिकाणी निलंबनाची कारवाईही होत आहे. मात्र ज्या काटेकोरपणे कॉपी रोखली जाते, त्याच काटेकोरपणे वार्षिक अभ्यासक्रम पूर्ण करण्याबाबत व गुणवत्तापूर्ण अध्यापनाबाबतही जबाबदारी निश्चित व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शिक्षण व्यवस्थेतील सर्व घटकांनी समान जबाबदारी स्वीकारल्यासच अपेक्षित बदल घडू शकतो, असे मत सुजाण नागरिकांनी मांडले आहे.

दरम्यान, कोरोना काळात दोन-तीन वर्षे नियमित शालेय वातावरणापासून दूर राहिलेली हीच विद्यार्थ्यांची बॅच असल्याने त्यांच्या मानसिक तयारीचाही विचार होणे आवश्यक आहे. अचानक कडक निर्बंधांच्या छायेत परीक्षा घेतल्याने विद्यार्थ्यांवर ताण वाढत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. काही ठिकाणी शिक्षकांवरील प्रशासकीय दबावाचा परिणाम विद्यार्थ्यांवर रागावणे, कठोर वागणूक देणे किंवा मानसिक दडपण आणणे अशा स्वरूपात होत असल्याचेही बोलले जात आहे.

यामुळे एकूण शालेय वातावरण तणावपूर्ण व 'टॉक्सिक' बनत असल्याची चिंता पालक व्यक्त करत आहेत. १५ ते १६ वर्षांच्या मुलामुलींवर अशा प्रकारचे दडपण टाकणे कितपत योग्य आहे, हा प्रश्न उपस्थित होत आहे. कॉपीमुक्त परीक्षांचा उद्देश निश्चितच स्वागतार्ह असला तरी त्यासाठी विद्यार्थ्यांची शैक्षणिक, मानसिक व भावनिक तयारी तितकीच महत्त्वाची आहे. अन्यथा एकतर्फी कठोरता ही टाळी नसून झापड ठरू शकते - आणि त्या झापडीचा आघात थेट विद्यार्थ्यांच्या मनावर व आत्मविश्वासावर होत असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# श्री किशन महाराज गुरु स्वामी यांच्या ५१ दिवसीय साधनेची भव्य सांगता; १११ जोडप्यांच्या हस्ते महायज्ञ संपन्न

किनवट /प्रतिनिधी दि.२३ : गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर वर्ष २०२५ मध्ये ३२५ दिवस अन्नत्यागाचा संकल्प करून उपास सुरू करणारे श्री किशन महाराज गुरु स्वामी यांनी आपल्या कठोर तपश्चर्येची सांगता पुस नदीच्या तीरावर, औदुंबर वृक्षाच्या पवित्र सान्निध्यात ५१ दिवसांच्या अखंड साधनेनंतर भव्य महायज्ञाने केली. पुसनदीच्या तीरावर प्रकाश पाटील यांच्या शेतात पार पडलेल्या या धार्मिक सोहळ्यात १११ जोडप्यांच्या हस्ते महायज्ञ विधिवत संपन्न झाला.

५१ दिवस अखंड धार्मिक साधना, संपूर्ण ५१ दिवस दररोज विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तिभावात पार पडले. यामध्ये रुद्राभिषेक, औदुंबर वृक्ष प्रदक्षिणा, नामस्मरण, हनुमान चालीसा पठण, दैनंदिन यज्ञ-हवन, गंगा पूजन व गंगा आरती अशा कार्यक्रमांचा समावेश होता. शेकडो हनुमान भक्तांच्या उपस्थितीत वातावरण सतत भक्तिमय व आध्यात्मिक उर्जेने भारलेले



होते. सर्व पूजा निशुल्क; देणगी-दक्षिणा स्वीकारली नाही, या संपूर्ण उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, यज्ञ व पूजेमध्ये सहभागी झालेल्या एकाही यजमानाकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क, दक्षिणा किंवा पूजेच्या साहित्याचे पैसे स्वीकारण्यात आले नाहीत. दानपेटी ठेवण्यात आली नाही, पावती पुस्तक फिरवले गेले नाही. सर्वसामान्य भक्तालाही कोणताही आर्थिक ताण न येता पूजेत सहभागी होता यावे, हा श्री किशन महाराज गुरु स्वामी यांचा प्रमुख हेतू होता.

परंतु दानशूर भक्तांचे गुप्त सहकार्य लाभले या भव्य कार्यक्रमासाठी लागणारी संपूर्ण अर्थव्यवस्था काही मोजक्या दानशूर हनुमान भक्तांनी उचलली. विशेष म्हणजे, या दानशूर व्यक्तींनी आपली नावे जाहीर होऊ नयेत, आपली सेवा केवळ भगवंतालाच माहीत असावी, अशा भावनेतून सहकार्य केले. त्यांची नावे वेळप्रसंगी जाहीर करण्यात येतील, असे श्री महाराजांनी स्पष्ट केले. भक्त समितीची अहोरात्र सेवा करंजखेड येथील हनुमान भक्त समितीने महिला, पुरुष, युवक, लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिक यांच्या सहकार्याने अहोरात्र परिश्रम घेत हा कार्यक्रम यशस्वी केला. अनेकांनी स्वतःला पूर्णतः या कार्यासाठी वाहून घेतले. कुणालाही व्यक्तिगत प्रसिद्धीची अपेक्षा नव्हती; सर्वांनी सेवा हनुमंत रायाच्या चरणी समर्पित केली. कार्यक्रमाच्या समारोपावेळी किशन महाराज गुरु स्वामी यांनी कोणाचेही आभार किंवा धन्यवाद व्यक्त न करता, ही सर्व सेवा हनुमंतरायाच्या चरणी समर्पित आहे. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन होऊ शकत नाही, असे सांगितले. दानशूर व सेवाभावी भक्तांना पुढेही असेच सत्कर्म करण्याची शक्ती मिळावी, अशी प्रार्थना त्यांनी हनुमंत राय व दत्तप्रभूंच्या चरणी केली. संपूर्ण परिसरात जय श्रीराम, जय हनुमानच्या जयघोषात या महायज्ञाची सांगता झाली आणि भक्तिमय वातावरणात एक ऐतिहासिक धार्मिक सोहळा यशस्वीरीत्या पूर्णत्वास गेला.